शनिवार । १९ एप्रिल १९८० । ७५ पैसे

# माणूस

## भारतीय समाजवादाकडे...



श्री. ग. मा.

समाजवादी आणि जनसंघी शेवटी वेगळे झाले. जयप्रकाशांनी लावलेली बाग सध्या तरी पूर्ण उध्वस्त झाली. विचारांपेक्षा माणसे भावनांवर, पूर्वग्रहांवर जगत असतात हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. कार्यक्रमाबाबत, ध्येयधोरणाबाबत मतभेद झाले आणि हे दोन गट वेगळे झाले, जनता पक्ष फुटला असे घडले नाही. समाजवाद्यांना भय वाटे की, जनसंघगट संख्येच्या बळावर पक्षाचा आज नाही उद्या ताबा घेणार आणि जनसंघीयांना समाजवाद्यांचा बौद्धिक सासुरवास नकोसा वाटला. आपल्या पूर्वग्रहांवर, द्वेषमत्सरांवर ही मंडळी मात करतील आणि कॉंग्रेसला एखादा समर्थ पर्याय दहापाच वर्षांत उभा राहील अशी ही जनता पक्षाची बाग लावताना जयप्रकाशांना आशा वाटत होती, ती आता पूर्ण मातीला मिळाली आणि गाडी आता पुन्हा मूळ ७१।७२ च्या सुमारास होती त्या मुक्कामावर आली. सर्वंकष इंदिरा शासन आणि तीन–चार विरोधी गट असे ७१।७२ मध्ये होते तसे राजकीय चित्र आता तयार झालेले आहे. सिंडिकेट कॉंग्रेसची जागा अरस कांग्रेसने घेतली. जनसंघाचा भारतीय जनता पक्ष झाला. समाजवाद्यांच्या हाती जनता पक्ष आणि भालोदचे नवे नाव आहे लोकदल. कम्युनिस्ट त्या वेळीही अलग होते, तसेच आजही आहेत. आणीबाणी आणि जयप्रकाशांसारखे सर्वमान्य नेतृत्व यामुळे ७१।७२ चे चित्र ७७ ला बदलले; तशीच समान सर्वव्यापी संकटाची स्थिती आणि एखादा सर्वमान्य नेता उदयास आल्याशिवाय आजचेही चित्र बदलेल असे दिसत नाही. राजकीय फुटीरपणा हा एकूण आपला स्थायीभाव दिसतो, क्वचित प्रसंगीच एखादा देशव्यापी राजकीय पर्याय उभा राहतो. कॉंग्रेस ५०।७५ वर्षे एक राहिली ती पारतंत्र्याच्या समान व सर्वव्यापी संकटामुळे व टिळक–गांधी–नेहरू यांच्या विभूतिसमान नेतृत्वामुळे. व्यक्तिगत रागलोभ, द्वेषमत्सर, निरनिराळ्या गटांचे स्वार्थ या दोन घटकांच्या मिश्रणामुळे तयार झालेल्या रसायनात वितळून जातात व देशव्यापी एकत्व टिकून राहते. हे दोन्ही घटक जनता पक्षाजवळ उरले नाहीत. आणीबाणी संपली. जयप्रकाश लांब राहिले किंवा त्यांना लांब ठेवले गेले आणि मिळालेली सत्ता टिकवून धरण्यासाठीसुद्धा एकत्र राहिले पाहिजे हा शहाणा व व्यवहारी स्वार्थ पाहण्याइतकीही मंडळी शुद्धीवर राहिली नाहीत. द्वेषाने आंधळेपणा आला. जो तो पुन्हा आपल्या पूर्वीच्या कोषात बंदिस्त झाला. जयप्रकाशांनी आणि आणीबाणीने हे वेगवेगळ्या प्रवाहात पोहणारे मासे एका मोठ्या समुद्रात आणन सोडले; पण समुद्रात पोहण्याचा सराव नसल्याने सगळ्यांच्या

नाकातोंडात पाणी गेले आणि मूळच्या लहान प्रवाहाकडे जो तो वळला आहे. सगळयांनी एकाधिकारशाही विरोध, म्हणजेच इंदिरा विरोध हे आपले मुख्य प्रचारसूत्र ठेवलेले दिसते. म्हणजे पुन्हा ७१-७२ चीच चूक. कल्पनादारिद्रयही तसेच. बाई त्या वेळी 'गरिबी हटाव'ची आकर्षक घोषणा देऊन जनमानस काबीज करीत होत्या. विरोधकांना फक्त 'इंदिरा हटाव' हवे असे त्या सांगत व लोकांनाही ते पटे. बाईपेक्षाही काही तरी मोठी झेप घेतल्याशिवाय तुमच्या पोकळ एकाधिकारशाही विरोधाला, नकारात्मक इंदिरा-हटाव भूमिकेला लोक कशी किंमत देणार आणि त्यांनी का द्यावी? बेबंदशाहीपेक्षा लोकांना एकाधिकारशाही परवडते असा परवाच्या लोकसभा निवडणुकांचा स्पष्ट कौल आहे. बेबंदशाहीची आठवण करून देणारे निरनिराळे आवाजच विरोधीपक्ष यापुढेही काढत राहणार असतील तर लोकही त्यांना विरोधीपक्ष म्हणूनच फार तर जगवत ठेवतील. सत्तेवर त्यांना न बसवण्याची दक्षता बाळगतील. शेवटी राज्यकर्ता पक्ष म्हणून एक प्रतिमा तयार व्हावी लागतेच. त्यासाठी पर्यायी धोरणे, दमदार नेतृत्व, पर्यायी संघटना हा सगळाच जामानिमा खडा असावा लागतो. फुटून वेगळे झाल्याला ४८ तासही उलटले नाहीत तो यांची झाली पुन्हा चुंबाचुंबी सुरू! अरे, मग भांडलात, वेगळे झालात ते कशासाठी? उभे राहा एकेकटयाच्या बळावर, निदान काही काळ तरी. थोडी उपासमार, हालअपेष्टा, उन्हाळा-पावसाळा सहन करून लोकांना कळू द्या तुमची तत्त्वनिष्ठा आणि त्यासाठी किंमत मोजण्याची तुमची तयारी. असे केले नाहीत तर लंगडे आणि आंधळे म्हणूनच लोक तुमच्याकडे पाहतील, टाकतील फार तर एखादे दुसरे नाणे पेटीत. दुबळयांची कीव केली जाते, त्यांना कुणी राज्यावर बसवत नाही. समाजवादी गटांजवळ तर असा काही स्वबळावर आधारित पर्यायच नसावा अशी त्यांची युत्यांसाठी, तडजोडीसाठी धावाधाव, शोधाशोध सुरू झालेली आहे. पाहायचे आता कुणाचा घरोबा ही मंडळी धरतात. महाराष्ट्रापुरते पाहता अरस काँग्रेस त्यांना जवळची दिसते आहे. स्थळ ओळखीचे आहे. जमायाला हरकत नसावी. आणि महाराष्ट्राबाहेर ही मंडळी आहेत तरी कुठे फारशी?

## मतभेदाचे दोन मुद्दे

फुटून वेगळे झाले तरी हे दोन्ही गट गांधी-जयप्रकाशांचा वारसा आम्ही पुढे चालवू असे म्हणत आहेत. 'नाहं कामये राज्यं' अशी गांधीजींची रोजची प्रार्थना होती व जयप्रकाशांनाही सत्तेचे रूढ मार्ग सोडून क्रांतीचा एखादा नवा पर्याय सापडतो का, हे पाहण्याची तहान लागलेली होती. हा गांधी-विनोबा-जयप्रकाशांचा अव्वल वारसा आहे व त्यावर हक्क सांगण्याचा, तो आम्ही पुढे चालवत आहोत हे म्हणण्याचा आज थोडाफार अधिकार कुणाला पोचत असेलच तर तो फक्त रा. स्व. संघाला आहे. संघ ही सांस्कृतिक संघटना आहे याचा अर्थ ती सत्तेचे राजकारण करत नाही, एवढाच घ्यायचा आहे. संस्कृती म्हणजे केवळ नाचगाण्यांचे कार्यक्रम नाहीत. राजकीय क्षेत्र हेही संस्कृतीचा एक भाग आहेच. संघाला राजकीय परिवर्तनाची मुळीच आकांक्षा नसती तर पंचवीस साली हेडगेवारांनी काँग्रेस सोडून या संस्थेला जन्म दिलाच नसता व निर्भेळ मानवसेवेचे आपले रामकृष्ण मिशनमधील कार्य सोडून गोळवलगुरुजींनी संघाची सूत्रे आपल्या हाती घेतलीच नसती! दोन बाबतीत हेगडेवार-सावरकर यांचे गांधीजींच्या काँग्रेसशी त्या काळी मतभेद झाले व मुख्यतः या दोन मुद्द्यांवरूनच हिंदू आणि हिंदी राष्ट्रवाद यांची प्रथम फारकत झाली. पहिला मुद्दा होता गांधीजींनी अहिंसामार्गाला दिलेले सार्वभौम महत्त्व हा. हेडगेवार-सावरकर यांची सशस्त्र क्रांती मार्गाची परंपरा होती. स्वातंत्र्यासाठी शक्य आणि योग्य वाटले तर हिंसा, सशस्त्र उठाव हे मार्ग हेडगेवारांनी वर्ज्य मानले नव्हते व सावरकर तर पूर्वायुष्यात अग्निगोलकांशी खेळणारे क्रांतिकारकच होते. गांधीजींनी मात्र अगदी भगतसिंगालाही कधी क्षमा केली नाही. दुसरा या दोन राष्ट्रवादांमध्ये मतभेदाचा मुद्दा होता तो मुस्लिम अनुनयाबाबतचा. अनुनयाने गांधीजी मुस्लिमांना डोक्यावर बसवत आहेत, हा हिंदू-मुस्लिम ऐक्याचा मार्ग नाही, असे सावरकर-हेडगेवारांचे व त्यांनी प्रतिपादन केलेल्या हिंदुत्ववादाचे म्हणणे होते. या दोन्ही मुद्द्यांबाबत गांधीजी चूक ठरले व हिंदुत्ववाद खरा ठरला असा इतिहासाचा दाखला आहे. ४२ मध्ये हिंसाचार मोठ्या प्रमाणा-


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : सत्तेचाळीसावा
१९ एप्रिल १९८०
किंमत : ७५ पैसे

संपादक
**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**

वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन.
अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

वर झाले, चळवळीला भूमिगत स्वरूप प्राप्त झाले व या सगळयाचा निषेध न करण्याइतपत गांधीजींचाही अहिंसाग्रह सैलसर झालेला होता. आपले स्वातंत्र्ययुद्ध सशस्त्र आणि निःशस्त्र, हिंसा-अहिंसा या दोन्ही मार्गांनी पुढे सरकले व शेवटी जागतिक परिस्थिती अनुकूल झाल्यावर भारत स्वतंत्र झाला. मुस्लिम-अनुनयाचे फलित म्हणजे पाकिस्तान–हिंदुत्ववाद नसता तर झाले यापेक्षा दुप्पट मोठे पाकिस्तान जीनांनी हिसकले असते. गांधीजींनी तर कोरा चेकच द्यायची तयारी दाखवली होती. या दोन्ही मुद्द्यांबाबत पुनर्विचार करावा असे गेल्या तीस-चाळीस वर्षांत काय घडले आहे? उलट अपरिहार्य म्हणून गांधीपरंपरेचा वारसा सांगणाऱ्या जयप्रकाशांनीच नक्षलवादी हिंसाचाराला मान्यता देऊन ठेवलेली आहे. पाकिस्तान झाले तरी मुस्लिम-प्रश्न आहे तेथेच आहे. तेव्हा जनता पक्षाच्या वेगळया झालेल्या घटकांनी, विशेषतः पूर्वाश्रमीच्या जनसंघीयांनी आपण जयप्रकाशांचा–गांधीजींचा वारसा चालविणार म्हणजे नेमके काय करणार याचाही तात्त्विक ऊहापोह नीट करून लोकांसमोर ठेवला पाहिजे. ज्याअर्थी पक्ष स्थापन करून निवडणुका लढविणार, सत्ता हस्तगत करू पाहणार त्या अर्थी गांधी–जयप्रकाशांचा सत्तानिरपेक्ष समाजपरिवर्तनाचा अव्वल व मुख्य वारसा कुठल्याच जनताघटकाला अभिप्रेत नाही हे उघड आहे. जयप्रकाशांनी आपल्या कारागृहातील रोजनिशीत लिहिले आहे–

> इतिहासाला विचारा की काही वर्षांपूर्वी
> बनू शकलो नसतो का पंतप्रधान ?
> पण मला क्रांतिशोधकाला दुसरेच मार्ग
> मान्य होते–हवे होते
> मार्ग त्यागाचे, सेवेचे, निर्माणाचे
> मार्ग संघर्षाचे, संपूर्ण क्रांतीचे......

आहे का तयारी या मार्गावरून जाण्याची अटलजींची किंवा मधू दंडवत्यांचीही ? आज तरी या दोघांनी व त्यांच्या अनुयायांनी या वारशावर आपला दावा सांगू नये. जयप्रकाशांना जो नंबर दोनचा मार्ग वाटत होता तो या मंडळींना नंबर एकचा वाटतो आहे. या नंबर दोनच्या मार्गाने जाणारेही समाजाला हवेच असतात, हा भाग वेगळा ! लोकांना चांगले राज्यकर्ते नको आहेत का ? जसे चांगले कारखानदार हवे असतात, चांगले शिक्षक हवे असतात तसे चांगले राज्यकर्ते हीही समाजाची एक गरज आहे व ती जनता पक्षाकडून पूर्ण झाली नाही, ही खरी लोकांची तक्रार आहे. फक्त गांधीजी-जयप्रकाशजी चांगले राज्यकर्ते, राजकारण करणारा कुशल वर्ग. एवढीच समाजाची गरज आहे, यामुळेच समाज परिवर्तित व विकसित होणार आहे असे मानत नव्हते. राज्यकर्त्यांवरही अंकुश ठेवणारी लोकशक्ती, समाजाची आत्मशक्ती जागृत करण्यावर त्यांचा मुख्य भर होता, त्यासाठी त्यांचा जीवनयज्ञ सुरू होता. 'संतो तपसा भूमीं धारयन्ति' हे वेदवचनच जणू त्यांच्या रूपाने समूर्त झाले होते. आयुष्यभर राजकारणात राहूनही 'नाहं कामये राज्यम्' अशी दैनंदिन प्रार्थना त्याशिवाय कशी होऊ शकली असती ? अटलजी–दंडवतेजी यांना तर राज्य हवे आहे, त्यांनी २८ महिने राज्य उपभोगलेही आहे. मग जयप्रकाशांचा, गांधीजींचा दुसरा कोणता वारसा त्यांच्या डोळयांसमोर आहे असे समजायचे ? विकेंद्रित अर्थ व समाजरचना एवढाच सध्या तरी हा वारसा दिसतो आहे व वेगळे राहून का होईना, तो जरी अटलजी–दंडवतेजी यांनी पुढे नेला तरी इंदिरा काँग्रेसला व कम्युनिस्टांना तो एक चांगला पर्याय ठरू शकेल. एकत्र राहून हे कार्य अर्थातच अधिक चांगल्या प्रकारे होऊ शकले असते. एकाजवळ राष्ट्रवादाची स्वयंभू शक्ती व आत्मनिर्भर संघटना होती. दुसऱ्याजवळ समतेची दृष्टी होती. आर्थिक प्रश्नांकडे आजवर तरी हिंदुत्ववाद्यांनी दुर्लक्षच केलेले आहे – दीनदयाळ उपाध्याय हाच काय तो एक सन्माननीय अपवाद. याउलट समाजवाद्यांजवळ नाही आत्मनिर्भरता–जी एखाद्या दृढ श्रद्धेवाचून कधीही निर्माण होत नाही. कम्युनिस्टांजवळ श्रद्धा आहे, तशीच राष्ट्रवाद्यांजवळही आहे. एकं कामगारांचे राज्य पृथ्वीवर आणू इच्छितो; दुसऱ्याला हवा आहे बलसागर भारत. समाजवाद्यांजवळ असे काय आहे की, ज्यासाठी वर्षानुवर्षे झुरत राहावे, पिढयानुपिढया झगडत राहावे, उपेक्षा झाली, अवमान आणि पराभव झाले तरी न खचता, न विकले जाता कंटकाकीर्ण मार्गाने झेंडा खांद्यावर घेऊन पुढे पुढे जातच राहावे ? एखादा सखोल आत्मप्रत्यय असला तरच असे सामर्थ्य, हे निश्चयाचे बळ निर्माण होत असते – जे आज, या दुभंगलेल्या स्थितीतही पूर्वाश्रमीच्या जनसंघीयांजवळ दिसते आहे. हिंदुत्ववादातून निघालेली ही राष्ट्रीय पुनर्निर्माणाची जबरदस्त प्रेरणा आणि समाजवाद्यांची समतादृष्टी यांचा जनता पक्षात संगम होऊ शकला असता; पण ती संधी हुकली. आताही वेगळा झालेला जो गट असे दोन्ही पंख विस्तारून झेप घेईल त्यालाच भवितव्य आहे, हे नीट ओळखूनच पुढची वाटचाल केलेली बरी. केवळ हिंदुत्ववाद, केवळ समाजवाद घेऊन हे गट पूर्वीप्रमाणेच अलग अलग चालत राहिले तर लवकरच दोघेही थकतील, गिळंकृतही होतील. विकेंद्रित अर्थरचना असलेला भारतच बलशाली भारत असू शकतो हे सत्य हिंदुत्ववाद्यांनी ध्यानात घ्यायला हवे व इतर नव्या–जुन्या जनतापक्षीयांनी, समाजवाद्यांनीही गांधीजींचा मुस्लिम अनुनयाचा, अहिंसा-परमोधर्मवादाचा पुनर्विचार करून हिंदुत्ववाद्यांची या क्षेत्रातली ऐतिहासिक कामगिरी मोकळेपणाने मान्य करायला हवी. अशा समन्वयातून जो ध्येयवाद, जी विचारसरणी, जो कार्यक्रम तयार होईल त्यात जयप्रकाश–गांधीजी असतील, तसेच शिवाजी–राणा प्रतापही असतील; नाही तर काहीच उभे राहू शकणार नाही. गांधीवादी समाजवाद असे या समन्वित विचारसरणीचे नामकरण करण्यात आलेले आहे; पण एखाद्या व्यक्तिनामापेक्षा सरळ भारतीय समाजवाद असेच का म्हणू नये ? प्रत्येक देशाने आपापल्या परंपरेप्रमाणे, लोकरिवाजाप्रमाणे नाही तरी समाजवादाची वेगवेगळी रूपे उत्क्रांत केलेली आहेतच. भारतीय किंवा दंडवते–जनतावाल्यांनी खेडयांच्या आधुनिकीकरणावर आधारलेला समाजवादाचा नवा विकेंद्रित भारतीय नमुना उत्क्रांत करण्याची मनीषा का बाळगू नये ? नेहरूंनी शहरे वाढवली. जनतावाल्यांनी खेडी मोठी करण्याची, आधुनिक करण्याची आकांक्षा बाळगावी एवढेच आज शक्य आहे, आवश्यक आहे. यावर जोर दिला तर देश खूप पुढे जाणार आहे. गांधीजींचा सत्तानिरपेक्ष मानवपरिवर्तनाचा प्रयोग ही फार लांबची गोष्ट आहे. सत्तेचा वापर करून, तिचा उपभोग घेऊन, विकेंद्रित समाजवादाचा एखादा पर्याय जरी भारतीय म्हणा, गोरे–दंडवते म्हणा, जनतावाले सिद्ध करून दाखव शकले तरी उद्याचा भारत त्यांचा ऋणी राहील – आजचा भारत जरी साशंक असला तरी...... ☐

## संध्याकाळचे पुणे

दि. बा. मोकाशी

# धूम्रपान की आरोग्य ? तुम्हीच निवड करा !

कर्मजात रोगही मनुजा, भोग सर्व त्याचा ॥
वृथा दोष देई दैवा, पुत्र मानवाचा ॥ध्रु॥
बुद्धिमान असुं दे कुणी, कुणी कलावंत ॥
व्यसन ज्यास जडले त्याचा, नाश हाच अंत ॥
व्यसन कल्पनेशी धावे, मार्ग उन्नतीचा ॥
वृथा दोष देई दैवा, पुत्र मानवाचा ॥१॥
नको नासिकेतही नस्य, मुखामधे पान ॥
नको मद्यपानहि अथवा, नको धूम्रपान ॥
व्यसन कोणतेही अंती, ग्रास जीवनाचा ।
वृथा दोष देई दैवा, पुत्र मानवाचा ॥२॥

क्षणभर वाटेल की ही गीतरामायणातील गीतेच आहेत; पण नव्हे. कीर्तनकार गोविंद खरे यांच्या कीर्तनातील ही पद्ये कीर्तनकार खरे यांची स्वयंरचित असून फार तर ती गीतरामायणाच्या धर्तीवर बेतली आहेत एवढेच म्हणता येईल. त्यांनी आपल्या गीत-आरोग्यातून राम, सीता, लक्ष्मण, रावण, हनुमान यांची हकालपट्टी करून तिथे धूम्रपान, मद्यपान, साक्षरता, संततिनियमन, विमायोजना अशी पात्रे घातली आहेत. संगीत नाटकातील प्रसिद्ध गाण्यांच्या धर्तीवर किंवा प्राचीन कवींच्या काव्यावर संस्कार करून त्यांनी काही कविता रचली आहे. मी त्यांना विचारले की, तुम्हास कवित्व कसे सुचले ? ते म्हणाले, ' मी कवी नाही. मी ' आल्टऱ्या ' म्हणजे आल्टर करणारा शिंपी आहे. ते आल्टऱ्या असे स्वतःला म्हणाले; पण तीही कला आहे. तुम्ही त्यांच्याप्रमाणे एखादी कविता आल्टर करूनच पहा म्हणजे कळेल, मी प्रयत्न केला—ठरवले—' संध्याकाळचे पुणे ' त्याहून सोपे.

□

मी ज्या गोविंद खऱ्यांविषयी बोलत आहे ते म्हणजे सुप्रसिद्ध आधुनिक कीर्तनकार डॉ. गोविंद खरे. लोकमान्यांचे नातजावई. सारसबागेतील (पुणे) हिरवळीवर दि. ७-४-१९८० या जागतिक आरोग्यदिनी सायंकाळी 'धूम्रपान अथवा आरोग्य—तुम्हीच निवड करा ' या त्या दिवशींच्या नेमलेल्या विषयावर कीर्तन होते. पुणे महानगरपालिकेतर्फे हा दिन साजरा केला जात असतो. पुणे शहराचे आरोग्यप्रमुख तो साजरा करतात. कीर्तनारंभी त्यांनी म्हटले,

वेगवेगळे विषय घेऊन आम्ही दरवर्षी हा दिन साजरा करीत आलो. या वर्षी 'धूम्रपान अथवा आरोग्य—तुम्हीच निवड करा ' हा विषय आहे. धूम्रपानाचे व्यसन विलक्षण वाढत आहे. लहान मुलेही धूम्रपान करताना पाहून वाईट वाटते. आजचे कीर्तनकार हे छंदाने कीर्तनकार आहेत. त्यांचा व्यवसाय डॉक्टरीचा आहे. आरोग्यविषयक कार्यक्रमाचे हे विसावे कीर्तन आहे.'

याआधी डॉ. गोविंद खरे नेहमीच्या सुटाबुटात व्यासपीठावर येऊन व्यवस्था पाहून गेले होते. व्यासपीठ तीन एक हात उंच व एका खोलीच्या आकाराचे टुमदार असे, गणपतीच्या डाव्या हाताच्या हिरवळीत मध्यावर उभारले होते. व्यासपीठावर तबला, एक तंतुवाद्य व पेटी अशी तीन वाद्ये होती. गोविंद खरे सर्व सरंजाम पाहून गेल्यावर पेटीवाल्यांनी गीतं गाऊन आम्हा प्रेक्षकांना थांबवून धरले. व्यासपीठासमोर तीस एक खुर्च्या मांडल्या होत्या त्या भरल्या होत्या.

दहा मिनिटात एकदम ट्रॅन्स्फर सीन झाला. बुटासुटात मंचाआड गेलेले डॉ. गोविंद खरे कीर्तनकार ह. भ. प. ( किंवा स. भ. प. ) गोविंदबुवा बनून आले. डोक्यावर पगडी, रेशिमकाठी उपरणे व धोतर. ते वर येऊन वाद्यवृंदात उभे राहताच आरोग्याधिकाऱ्यांनी त्यांना हार घालून नारळ देऊन गौरविले. उदबत्त्यांची जुडी लावली आणि त्या सुवासात कीर्तनारंभ झाला.

'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः' असे गुरुस्तवन झाल्यावर गोविंद खरे म्हणाले, 'समोर श्रोते आहेत ते कीर्तनाला आले आहेत असे मी समजत नाही, जिथे गर्दी आहेच तिथे कीर्तनाला उभे राहू या असा विचार केला. आता कीर्तनाला ही बागेतील गर्दीच का निवडली ? तर इथे म्हातारे नागरिक दर्शनाला व फिरण्यास येतात व आरोग्याची चर्चा करितात. ते परस्परांचे स्वागतच मुळी असं करितात— ' काय ! कसं आहे ब्लडप्रेशर ? ' ' अरे ! त्याला मोतीबिंदु झालाय ऐकतो ' वगैरे. तेव्हा इथे त्यासाठी आरोग्यावरील कीर्तन ठरविले. आरोग्यासंबंधी मी एवढेच सांगेन.

हृदयी धरा हा बोध खरा ॥ ध्रु. ॥
संयमी सर्व सुखाचा झरा ॥
निरोगिता हा स्वर्ग बरा ॥
रोगापुढती नरक बरा ॥
रोगरिपूचा नाश करा—
आरोग्याचा मंत्र स्मरा ॥

माझी गाणी मेड टु ऑर्डर असतात. पूर्वी गंधर्वांच्या नाटकात गाण्याच्या वेळी गप्पा मारायला वाव मिळे. तसं कीर्तनात नमन असतं. विठ्ठल—विठ्ठल—विठ्ठल ! नमन म्हणजे ज्यात मन रमत नसतं ते. सर्वांना सुख हवं असतं ! सुख कशात आहे ? माझी व्याख्या— आरोग्यं धनसंपदा ! नवरा खूप धनवान केला; पण ' आवडीनं केला वर । त्याला दिवसा खोकला रात्री ज्वर ' असं असेल तर काय सुख ?

□

कीर्तनकारबुवा आपल्या पूर्वरंगात आरोग्यावरून धूम्रपान या विषयावर येईपर्यंत बराच वेळ आहे. तोपर्यंत बुवांची माहिती घेता येईल. म्हणजे डॉक्टर असून ते कीर्तनकार कसे झाले वगैरे. त्यांना नंतर विचारल्यावर ते म्हणाले, ' लोकांची पहिली कीर्तने देवालयात होतात. माझे पहिले कीर्तन रुग्णालयात झाले. कीर्तनकार होईन हे माझ्या स्वप्नातही नव्हते. कुणी पूर्वज कीर्तनकार नव्हते. वंशज कीर्तनकार नाहीत. वडील संस्कृत पंडित व वैद्य होते. औंधच्या रुग्णालयात रुग्णांसाठी १५ ऑगस्टला करावयाच्या कार्यक्रमात १९५९ साली रुग्णांना आवडेल या कल्पनेने पहिले कीर्तन केले. म्हणजे मीच सुचविले व ते देशपांडे म्हणून मेडिको सोशल ऑफिसर होते त्यांनी मान्य केले. त्यांनी हा उपकारच केला माझ्यावर. कीर्तन काय करावं याचा विचार करू लागलो. पारंपारिक कीर्तनात जीवन–मृत्युबद्दल ठराविक कल्पना मांडलेली असते. जीवन असार आहे–नरदेह नश्वर आहे. हे का क्षयाच्या रुग्णापुढं सांगायचं ? म्हणून निवृत्तिपर कीर्तनापेक्षा प्रवृत्तिपर बोलावं म्हणून आरोग्याचा विषय कीर्तनासाठी निवडला. अर्थात कीर्तनाची परंपरा व प्रतिष्ठा याचं पावित्र्य ठेवायचं. '

या पहिल्या कीर्तनाला त्यांनी ' धर्म व आरोग्य एकच आहेत ' असा पूर्वरंग केला. उत्तररंगासाठी आख्यान हवं. रुग्णातील एका रुग्णानं दाखल झाल्यापासून डायरी ठेवली होती. त्याच्या मुली एकेक वाद्य वाजवण्यात हुषार होत्या. घरी जावं व मुलींचा ऑर्केस्ट्रा एकत रहावं अशो त्यांची इच्छा. या रुग्णाची सर्व हकीगत आख्यानात गुंतवली. त्याला चितोपंत उदास हे नाव ठेवलं. त्यातलं एक पद त्यांनी सांगितलं ते असे,

जागेस ओल, वरि डास चिलीट भारी ।
घाणेरडे परस अंगण ओटि सारी ।
स्त्री कर्कशा तशि घरी किरकोरि पोरे ॥
देवा कधोहि गृहवास असा नको रे ॥१॥

गोविंद खरे म्हणाले, 'ललित म्हणून मी जे कीर्तन केलं ती आख्यान्यातील अतिशयोक्ति, वस्तुस्थिती होती; रुग्ण ते ऐकताना डोळयांना टॉवेल लावून पुसू लागले. '

¤

सारसबागेतील डॉक्टरसाहेबांचे कीर्तन तसे चांगले झाले. फक्त आजचा जो धूम्रपानं विषय होता त्या विषयाच्या दृष्टीने थोडे कमी पडले. अजून त्यांचा हा विषय बसला नसेल. विडी, तंबाखू, सिगारेट याविषयी काही माहिती फार मजेशीर आहे. आज विडी, सिगारेट, पाइप, चिरूट, तपकीर, खाण्याची तंबाखू यांचा इतका प्रचार झाला आहे की आपल्याकडे वेदकालापासून तंबाखू होती असे वाटावे; पण हिंदुस्तानात तंबाखूचा पहिला उल्लेख इ. स. १६०५ मध्ये आढळतो. तत्पूर्वी आपल्याकडे तंबाखू हा प्रकार नव्हता. तंबाखू आपल्याकडे युरोपिअनननी आणली असावी.

अमेरिकेचा शोध लागण्याआधी जगातही इतरत्र तंबाखूचा वापर नव्हता. आपल्याकडे तंबाखूवर काही संस्कृत वचने व शब्द दिसतात. ते सर्व सतराव्या शतकात किंवा नंतर बनवले आहेत. उदा० धूम्रपान याचा अर्थ कोणत्या वाळलेल्या पानांचा धूर ओढणे एवढाच आहे. अनेक औषधींची धूम्रपाने आयुर्वेदात सांगितली आहेत. धूम्रपानाचा नवा अर्थ गेल्या तीनशे वर्षातला आहे. अमेरिकेत जेव्हा युरोपियन लोक गेले तेव्हा तिथे त्यांना तंबाखू सर्व तऱ्हेनं वापरण्यात आढळली. तंबाखूला सर्व भाषांतून असलेली नावे ही अमेरिकेतील मूळ नावांवरून घेतली आहेत. अमेरिकेतील रेडइंडियन तंबाखूला पेटम्, तबक, ताबोक, तंबोक असे म्हणत.

आपल्याकडे तंबाखू सतराव्या शतकाच्या आरंभी आली, असे धरले तर केवळ साडेतीनशे वर्षांत तंबाखूचा प्रसार आपल्याकडे खेडोपाडी व्हावा, तिला पानात गुंडाळून विकण्याचा महाउद्योग देशभर व्हावा, एक वेळ पाणी मिळणार नाही पण तंबाखू मिळेल अशी अवस्था यावी; एवढेच काय पण आमच्या ग्रामीण कथांतून ती अगदी सहजपणे यावी किंबहुना तिचा उल्लेख आला नाही तर ती कथा ग्रामीण ठरू नये इतकी ती ग्रामीण जीवनाशी आत्मसात व्हावी याचे मला नवल वाटते.

आमच्या लहानपणी खेडेगावांतून एक कोरून पोकळ केलेला ठोकळा असे. यात एका खणात तंबाखू एका खणात विडी वळण्याची आपट्याची पाने ठेवलेली असत. हीच आपट्याची पाने पुढे सोने म्हणून लुटत व वाटीत याची आम्हाला गम्मत वाटे. या विडीच्या ठोकळ्यात एक चकमक म्हणजे पोलादाचा पातळ तुकडा, एक गारगोटी व बांबूच्या बोटभर लांब तुकडयाच्या पोकळीत कापूस भरलेला असे. विडी वळून तयार झाली की ती तोंडात धरून चकमकीने नळीतील कापसावर ठिणगी पाडून फुंकर मारताच कापूस पेट घेई. त्यावर विडी पेटवून परत बोटाने कापूस दाबून विझवल्यावर, चकमक परत ठोकळ्यात जाई. हा ठोकळा इकडून तिकडे उचलायला मूठ ठेवलेली असे. आपण जशी सिगरेटची केस पटकन उघडून पुढे धरून म्हणतो, ' हॅव वन ' तसाच हा ठोकळा आल्यागेल्याच्या पुढे सारण्याचा रिवाज होता. हा ठोकळा जातिभेदातीत असे.

¤

डॉ. खरे आपल्या कीर्तनात म्हणाले की, आज भयंकर व्यसने तरुण लोकांत वाढली आहेत. इतकी की त्याची कल्पना पालकांना येणार नाही. व्यसनाची व्याख्या गोविंद खरे यांनी केली नाही; पण मी अशी करीन : ' जे प्रमाणाबाहेर वारंवार करावेसे वाटते व तसे करणे आवरता येत नाही ते व्यसन. ' दिवसातून तीन वेळा आपण खातो; पण जर खाण्याचा मोह न आवरून दिवसभर चरत राहिलो तर ते व्यसन. दारूचा एखादा घुटका ठीक; पण सारखी दारू लागत राहणे हे व्यसन. सिगारेटच्या व्यसनाबद्दल सांगताना गोविंद खरे म्हणाले,

' एक सिगारेट जस्ट फॉर कंपनी. मग कुणाची कंपनी नाही म्हणून एकटेपणा घालवण्यासाठी सिगारेट. असे वाढता वाढता चेन स्मोकर तयार होतो. एका माणसाबद्दल मी ऐकले की, ' तो फक्त झोपेत सिगारेट ओढीत नाही. ' मला वाटते, झोपेत असताना बायकोला सिगारेट तोंडात घालायला त्याने सांगितले असेल.' मुलीची पर्स पहा, सिगरेटी सापडतील. सिगारेट हा शिष्टाचार झालाय. अभिनेता बोटात किंवा तोंडात सिगरेट धरतो–(किंवा अभिनेत्री)–तसेच करावेसे वाटते. लक्षात ठेवा, रोग, गुन्हा, व्यसन हे तिन्ही लपवावं तेवढी वाढत जातात. मुलानं सिगारेट ओढल्याचं कळलं की थाडकन थोबाडीत द्या ! कडक शासन करा. ते त्याच्या कल्याणासाठीच आहे.

पौराणिककाळी तंबाखू नसावी. नाही तर

पृष्ठ २१ वर

# मुंबई-वार्ता

किरण जोग

## □ भारतीय जनतापक्ष

राष्ट्रीय पातळीवरील घटनांचे पडसाद कायमच प्रांतिक पातळीवर उमटत असतात. गेल्या आठवड्यात दिल्ली येथील भूतपूर्व जनसंघाच्या परिषदेत अत्यंत नाइलाजाने जो नवीन पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला त्यामुळे जनतापक्षात तिसऱ्यांदा फूट पडली व 'भारतीय जनतापक्ष' या नवीन पक्षाचा राजकारणाच्या क्षितिजावर उदय झाला. या एका गोष्टीमुळे विविध राज्यांच्या निवडणूक-हालचालींवर व विधानसभेच्या निकालांवर थोड्याबहुत प्रमाणावर तरी परिणाम होणे अपरिहार्यच आहे. मुंबई या गोष्टीला अपवाद असण्याचे कारण नाही.

जेव्हा जनतापक्ष स्थापन झाला तेव्हा त्यात विलीन झालेल्यांपैकी जनसंघ व समाजवादी व थोडे संघटना कॉंग्रेसजन यांचे मुंबईत जाणवण्याजोगे अस्तित्व होते. जनसंघाचे एके काळी १५ नगरसेवक तर समाजवादी ८ नगरसेवक होते व लोकसभा, विधानसभेत जनसंघ, समाजवादी नावाखाली त्यांनी लक्षणीय मतेही मिळविली होती,

आज भारतीय जनतापार्टीच्या स्थापनेनंतर किमान मुंबईत तरी जनसंघ व थोडेबहुत संघटना कॉंग्रेसजन यांचाच हा पक्ष असेल. नव्या पक्षाच्या जडणघडणीत राष्ट्रीय स्तरावर मुंबईचे खासदार राम जेठमलानी यांना महत्त्वाचे स्थान दिले असल्याने या पक्षाचा शहरापुरता तरी व्यापक प्रसार करायचा प्रयत्न अधिक योग्य दिशेने चालू राहू शकेल. शहरातील अनेक वर्गांवर राम जेठमलानी यांचे असलेले वर्चस्व वा प्रभाव याचा फायदा शहराचा विचार करताना नव्या पक्षाला मिळेल.

नवनिर्मित पक्ष व आता असलेली नवनिर्मित पक्षाची शहरातील स्थिती यांचा विचार केल्यास, विधानसभा-निवडणूक स्व-बळावर हा पक्ष लढवू शकेल अशी निदान आज तरी स्थिती नाही. नवीन पक्षाचे विसर्जित विधानसभेत मुंबईतून ६-७ आमदार होते तर २० नगरसेवक या पक्षाचे आहेत. तसेच राम जेठमलानी हे एकमेव खासदार आहेत.

मला मिळालेल्या माहितीनुसार 'भारतीय जनतापक्ष' मुंबईतील विधानसभेच्या ३४ जागांपैकी १० जागा लढविण्याचा प्रयत्न करेल. यात विद्यमान आमदार जेथून निवडून आले आहेत तेथील जागांबरोबर पश्चिम उपनगरात ३-४ ठिकाणी भारतीय जनतापार्टी आपले उमेदवार उभे करेल.

इतर पक्षांबरोबर समझोत्याचा विचार करताना अर्स कॉंग्रेस व जनतापक्ष यांच्याबरोबर समझोता होण्याचा प्रयत्न होईल असे दिसते. मुंबईतील विधानसभेच्या ३४ जागांपैकी जनता, भारतीय जनता व अर्स कॉंग्रेस यांनी अनुक्रमे १०, १६ व ८ अशा जागा वाटून घ्याव्या अशी बोलणी होण्याची शक्यता दिसते; परंतु एक मात्र निश्चित की, कोणत्याही परिस्थितीत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाशी नवनिर्मित 'भारतीय जनता' युती करणे संभवनीय नाही.

यामुळे भांडुप-कांजूरमार्ग तसेच वरळी या ठिकाणी लढत देताना मार्क्सवादी कम्युनिस्टांचे बळ आता निश्चतपणे घटलेले असेल. दुहेरी लढतच जर प्रत्येक ठिकाणी होत असेल तर मार्क्सवादी,रिपब्लिकनपक्षाचे विविध गट इत्यादींना शहरात काही स्थान टिकविता येईल. जनता पक्षातून फुटलेला मृणाल गोरे यांचा समाजवादी गट हा 'जनता'शी सहकार्य करतो की परत सर्व समाजवादी राष्ट्रीय पातळीवर एकत्र आल्यास राज्यपातळीवर त्यांचा परिणाम होतो हे आज तरी सांगणे कठीण आहे. तसे न झाल्यास हा गट स्व-बळावर विधानसभेसाठी २-३ ठिकाणी आपले उमेदवार उभे करून त्यांना इतरांचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न करील असे दिसते.

लोकसभा निवडणुकीत झालेल्या मतदानाचा विधानसभेच्या मतदारसंघाप्रमाणे विचार केल्यास शिवसेनेला एकाच विधानसभा क्षेत्रात बहुमत मिळाले होते. त्या ठिकाणाहून 'सेना' श्री. वामनराव महाडीक यांना तिकिट देण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे सुधीर जोशी, मनोहर जोशी, प्रमोद नवलकर इत्यादि मंडळीही निवडणुकीच्या रिंगणात येतील अशी स्थिती दिसते; परंतु आज अशी स्थिती आहे की कोणाशीही समझोता ('सेना' करायला उत्सुक असूनही) न झाल्यास शिवसेना येत्या निवडणुकीत थोडेही यश मिळवू शकेल अशी शक्यता नाही. तसेच कॉंग्रेस(इं) पासून तो भारतीय जनतापर्यंत सर्वच पक्षांत कोणत्याही परिस्थितीत 'शिवसेनेशी समझोता नको' म्हणणाऱ्यांचे गट असल्याने 'सेनेच्या' हाती काही येईल अशी शक्यता नाही.

तिकिट-उत्सुकांनी आतापासूनच विविध पक्षांच्या दाराशी गर्दी करायला सुरुवात केली आहे व सध्या इंदिरा कॉंग्रेसमध्ये चलती नाणी असल्याने तिकडे गर्दी जास्त आहे. शहरात आज 'संघटना' व्यापक नसूनही कॉंग्रेस (इं) इंदिरा गांधी यांच्या नावावर चांगली मते व जागा मिळवण्याचा प्रयत्न करेल हे निश्चित! उत्तर मुंबईत २, पूर्व मुंबईत (मुलुंड ते चेंबूर) २, उत्तर पश्चिम मुंबईत १ (मालाड ते पार्ले), उत्तर वायव्य मुंबईत (गोरेगाव) १ व मध्यमुंबईत (प्रमिला दंडवते व न्यायमूर्ती भोळे यांचे मतदारसंघ) ६ अशा १२ ठिकाणी आज तरी कॉंग्रेस (इं) विरुद्ध दोन उमेदवार उभे राहिल्यास कॉंग्रेस (इं) चा विजय निश्चित दिसतो. याशिवाय इतरही ठिकाणी निवडणूक हालचालींना जोर चढत आहे.

आमदार प्रभाकरपंत पटवर्धन यांच्याऐवजी तेथे (आमदार पटवर्धन यांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे) भारतीय जनतापार्टीचे तिकिट श्री. वामनराव परब यांना मिळण्याची शक्यता आहे. असो.

## □ सिगरेट व आरोग्यदिन

गाडीत, बसमध्ये, स्टेशनवर, ऑफिसमध्ये असे ठिकठिकाणी धूम्रपान करणाऱ्या मुंबईकरांवर सध्या मोठीच आफत ओढवली आहे. कारण किरकोळ व घाऊक अशा सिगरेटविक्रेत्यांनी ' सिगरेटविक्री ' थांबविण्याचा निर्णय घेतल्याने सिगरेटप्रेमी मुंबईकरांची अवस्था आता ' जल बिन मच्छली ' अशी झाली असल्यास नवल नाही.

विक्रेत्यांना मिळणारे सिगरेटविक्रीबद्दलचे कमिशन हे अत्यंत अल्प असल्याने व बरेच दिवस या ना त्या मार्गाने प्रयत्न करून हे कमिशन वाढवून मिळत नसल्यामुळे अखेर विक्रेत्यांनी हे सिगरेटविक्री बंद आंदोलन सुरू केले आहे. आधी भेटी.गाठी, विनंत्या इत्यादि मार्गांनी प्रयत्न करूनही या प्रश्नाची समाधानकारक तोड निघाल्याचे दिसत नाही.

किरकोळ सिगरेटविक्रेत्यांना १००० मागे ६ रुपये विक्रीकमिशन मिळते व ते अत्यंत अल्प आहे, यात शंकाच नाही. त्यामुळे विक्री झाली काय अथवा नाही काय विक्रेत्यांचा एकदम मोठा तोटा होईल अशातला काही भाग दिसत नाही, परंतु हा संप जर असाच चालू राहिला तर ग्राहकांबरोबर उत्पादन करणाऱ्या सिगरेटकंपन्यांना तडजोडीसाठी पुढे यावे लागेल यात शंकाच नाही.

गाडीत ठिकठिकाणी ' धूम्रपान बंद ' असे बोर्ड लावले असूनही आरामात धूम्रपान करणाऱ्यांची संख्या या शब्दात काही कमी नाही. तसेच यामुळे अपघात होऊन आग लागण्याचे प्रकारही झाल्याची नोंद अनेक वेळा झालेली आहे, परंतु अपघात होणे व आग लागणे याचा धूम्रपानाशी संबंध असूनही वा धूम्रपान घेणाऱ्या व्यक्तीवर पोलीस ताबडतोब कृती करत, ना इतर प्रवासी त्यांच्या विरुद्ध तक्रार करत ! या दृष्टीने सध्याचे ' सिगरेट बंद ' काही वाईट नाही.

मुंबईतील ७० हजारांवर कॉलेज–मुलामुलींपैकी अनेकांच्यात धूम्रपानाचे व्यसन वाढत आहे. अनेक महाविद्यालयात सिगरेट ओढताना कॉलेज–कन्यकाही आघाडीवर असतात असे दिसते. नुकत्याच साजऱ्या झालेल्या आरोग्यदिनाच्या निमित्ताने या सिगरेट ओढण्यातील धोक्यावर ठिकठिकाणी शहरात परिषदा घेऊनही दिलेल्या इशाऱ्याचा हे ' अग्निहोत्री ' विचार करतील अशी शक्यता नाही आणि अगदी युद्ध-पातळीवर सिगरेटविरोधी मोहीम, काही पाश्चात्य देशांप्रमाणे येथे सुरू होईल अशी शक्यता नाही.

गंमत म्हणजे जागतिक आरोग्यदिनानिमित्त सिगरेट की आयुष्य ? अशा प्रकारे परिषदा व पत्रके वाटली जात असतानाच सिगरेटविक्री बंद झाली असल्याने, नकळतपणे धूम्रपान विरोधी मोहीम योजनेला त्यांचा फायदा झाला आहे; परंतु याचा अर्थ असा नाही की किरकोळ व घाऊक सिगरेटविक्रेत्यांच्या मागण्या योग्य नाहीत. त्यांच्या मागण्यांचा विचार होणे हे अत्यंत आवश्यक आहे.

शहरात आज जरी सिगरेटविक्री बंद असलेली दिसत आहे तरी वसई, डोंबिवली, कल्याण येथून काही मुंबईतील धूम्रप्रेमी सिगरेट आणून ओढताना दिसतात. तसेच परदेशी फाइव्ह, फाइव्हसारख्या सिगरेटची किंमतही वाढलेली दिसत आहे. त्याचप्रमाणे अनेक ठिकाणी काळ्या बाजारातून लोक सिगरेट दुप्पट किंमत घेऊन विकत घेताना दिसतात. ' पिनेवाले पिते हैं ! ' मग ते मद्य असो वा सिगरेट ! जागतिक आरोग्यदिन झिंदाबाद !

### परमेश्वराच्या सुटकेची मागणी !

मुंबईत निघालेल्या वारकऱ्यांच्या मोर्चाने गेल्या आठवड्यात सर्वांचे लक्ष वेधून घेतले. अत्यंत अभिनव पद्धतीने मंत्रालयावर मोर्चा नेऊन या वारकऱ्यांनी आपली बाजू मांडण्याचा प्रयत्न केला. गंमत म्हणजे पंढरपूरच्या बडव्यांच्या तावडीतून विठोबाची मुक्तता करा अशी मागणी हे भक्तजन करत होते.

आतापर्यंत असा प्रकार कोठे घडला नसावा. एकंदरीत देवांनी भक्तांची दुष्टांच्या तावडीतून सुटका करावी असा प्रकार असतो. परंतु पैसे उकळणे व वाममार्गाने भोळ्या–अशिक्षित भक्तांची फसवणूक करावी हा पंढरपूरचा प्रकार गेली अनेक वर्षे चालू असल्याने अखेर ' देवाच्या सुटकेचा ' प्रश्न या भक्तजनांना सरकार-दरबारी मांडावा लागला !

मुंबईत याविरुद्ध मोर्चा काढून व निदर्शने करून प्रश्न सुटणार नसला तरी गेली कित्येक दशके चालू असणाऱ्या या अन्यायाला वाचा फोडण्याचा एक निश्चित असा हा प्रयत्न होता. यामुळे देवाची सुटका होते की नाही हे तोच जाणे ! परंतु भक्तांची बडव्यांच्या तावडीतून सुटका करून घेणे कठीण दिसते ! □

# न्याययंत्रणा
## मर्यादा व उणीवा

वा. दा. रानडे

' किस्सा कुर्सीका ' खटल्यात सुप्रीम कोर्टाने संजय गांधी आणि माजी केंद्रीय मंत्री विद्याचरण शुक्ला यांच्यावरील सर्व आरोपांतून त्यांना पुराव्याअभावी निर्दोष ठरविले आणि दिल्लीच्या सेशन्स कोर्टाने त्यांना दिलेली शिक्षा रद्द केली. आपल्या प्रचलित न्याययंत्रणेतील सारे दोष व उणीवा या खटल्याच्या निकालाने पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

आपली न्याययंत्रणा व न्यायपद्धती ब्रिटिश पद्धतीवर आधारलेली आहे. गुन्हे घडल्याचे साक्षीपुराव्याने निर्विवादपणे सिद्ध झाले पाहिजे या तत्त्वावर या पद्धतीत भर आहे. तेव्हा त्यातून जो न्याय मिळतो तो साक्षीपुराव्याचा न्याय असतो. गुन्हा घडण्याचे सिद्ध करणारा निर्णायक पुरावा उपलब्ध नसेल तर संशयाचा फायदा मिळून आरोपी निर्दोषी सुटतो. निर्दोष सुटणारा आरोपी निर्दोषी असतोच असे नाही. त्याने गुन्हा केल्याचे निश्चितपणे माहीत असले तरी त्यासंबंधी पुरावा सादर करता येत नसेल तर संशयाचा फायदा मिळून तो निर्दोष सुटतो. पुराव्यात काही दुवे कच्चे राहिले तर त्याचा फायदा आरोपीला मिळतो. गुन्ह्याच्या तपासाची चक्रे आपल्याकडे एवढ्या कूर्मगतीने चालतात की पुरावा किंवा त्यातील महत्त्वाचे दुवे नष्ट करण्याची, साक्षीदार फोडण्याची संधी आरोपीस मिळते. आरोपीचे वकील त्याचा कौशल्याने उपयोग करून घेतात.

किस्सा कुर्सी का प्रकरणी सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निकालाचा विचार या दृष्टिकोनातून करायला हवा. ' किस्सा कुर्सी का ' चित्रपटाची फिल्म नष्ट झाली किंवा अदृश्य झाली ही वस्तुस्थिती आहे हे कोर्टाने मान्य केले आहे; पण ही फिल्म संजय गांधी व विद्याचरण शुक्ला यांनीच नष्ट केली,

संगनमताने याबाबतचे बेत त्यांनी आखले असे निर्णायकपणे सिद्ध करणारा पुरावा फिर्यादी पक्ष सादर करू शकलेला नाही, त्यामुळे कोर्टाने त्यांना निर्दोष ठरविले आहे. गुन्ह्याची घटना घडल्यानंतर दीड वर्षाने त्याचा तपास सुरू झाला. दरम्यानच्या काळात महत्त्वाचा पुरावा नष्ट करण्यास संधी मिळालेली होती. त्या वेळच्या पंतप्रधान श्रीमती गांधी आणि केंद्र सरकारच्या कार्यपद्धतीवर या चित्रपटात टीका असल्याने तो नष्ट करावा असे आरोपींना वाटत होते असे फिर्यादी पक्षाचे म्हणणे असेल तर संजय गांधी व शुक्ल यांच्याशिवाय तिसऱ्या व्यक्तीचाही हात हा चित्रपट नष्ट करण्यात असण्याची शक्यता नाकारता येत नाही असे निकालपत्रात म्हटले आहे. तपासास दीड वर्ष विलंब, काही पुरावा नष्ट, काही महत्त्वाचे साक्षीदार फुटले या अडचणी असल्या तरी आरोपींवरील आरोप निर्विवादपणे सिद्ध करण्याची जबाबदारी फिर्यादी पक्षावर राहतेच. ती त्याला पार पाडता आलेली नाही असा अभिप्राय न्यायमूर्तींनी व्यक्त केला आहे.

'किस्सा कुर्सी का' चित्रपटाचे निर्माते अमृत नहाटा यांच्या साक्षीवर विश्वास ठेवणे कठीण आहे असे मत कोर्टाने व्यक्त केले आहे.


'किस्सा कुर्सी का' प्रकरण आता सुपरिचित झालेले आहे. त्याची पुनरावृत्ती करीत नाही; पण विवेचनासाठी आवश्यक तेवढ्याच मुद्द्यांचा उल्लेख करीत आहे. आणीबाणीतील पंतप्रधान वा केंद्रीय मंत्रिमंडळाच्या कार्यपद्धतीवर टीका करणारा हा चित्रपट अमृत नहाटा यांनी तयार केला. चित्रपट पुरा झाल्यावर यू सर्टिफिकेटसाठी त्यांनी १९ एप्रिल १९७५ ला सेन्सॉर बोर्डाकडे अर्ज केला. तिघांचे मत अनुकूल व दोघांचे प्रतिकूल होते; पण चित्रपटातील बराच भाग कापून त्याला सर्टिफिकेट देण्याचे रिव्हिजन कमिटीने ६ विरुद्ध १ मताने ठरविले; पण कमिटीचे अध्यक्ष थापा यांची खात्री पटली नव्हती. चित्रपटाला राजकीय रंग आहे आणि त्यात देशातील लोकशाहीचे विडंबन केले आहे तेव्हा त्याला सर्टिफिकेट देणे कितपत योग्य असे त्यांना वाटू लागले. तेव्हा केंद्रीय माहितीखात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनाच चित्रपट दाखवून अंतिम निर्णय घ्यावा असे त्यांनी ठरविले. माहिती व नभोवाणी खात्याचे संयुक्त सचिव एस एम मुझीक यांना २२ मे १९७५ ला चित्रपट दाखविण्यात आला. चित्रपटात राजकीय पद्धती, काही व्यक्ती आणि छोट्या मोटारींचा प्रकल्प यावर टीका असली तरी समर्थ सरकारने अशा टीकेची भीति बाळगण्याचे कारण नाही असे त्यांचे मत होते. त्यांनी एक टिपण तयार करून ते खात्याचे सचिव ए. जे. किडवाई यांच्याकडे पाठविले. त्यांनी ते त्या वेळचे केंद्रीय माहितीमंत्री इंद्रकुमार गुजराल यांच्यापुढे ठेवले; पण त्यावर काहीच निर्णय घेतला गेला नाही.

नहाटा यांनी ११ जून १९७५ ला सुप्रीम कोर्टात अर्ज केला. पंचवीस जूनला आणीबाणी जाहीर झाली. गुजराल यांच्या जागी शुक्ल माहितीमंत्री झाले. चित्रपटाला बंदी करून तो जप्त करावा असा हुकूम त्यांना दिला. नहाटा यांनी चित्रपटाच्या सर्व प्रिंटस व निगेटिव्ह केंद्रसरकारच्याच स्वाधीन करावी असा आदेश सुप्रीम कोर्टाने १८ जुलै १९७५ ला दिला. प्रिंटस् सुरक्षित ठेवण्यात येतील असे आश्वासन सरकारी वकिलाने दिले होते. ७ ऑगस्ट १९७५ ला मेसर्स बाँबे फिल्मस् लॅबोरेटरी (प्रा.) लि. या कंपनीच्या मुंबई कचेरीवर अधिकाऱ्यांनी छापा घालून या चित्रपटाच्या सर्व प्रिंटस्, निगेटिव्हज्, साउंड ट्रॅक आणि चित्र संकलन करताना वाया गेलेला भागसुद्धा जप्त केला. त्यानंतर २९ ऑक्टोबर १९७५ ला नहाटा यांच्या अर्जावर सुप्रीम कोर्टाने हा चित्रपट कोर्टाला १७ नोव्हेंबर १९७५ ला कोर्टास दाखवावा असा आदेश दिला. पंधरा दिवस आधी सरकारने कळविले की, सरकारजवळ एकच पॉझिटिव्ह प्रिंट होता तो बेपत्ता आहे. प्रिंटचा शोध करा किंवा निगेटिव्हवरून दुसरा प्रिंट तयार करा असे कोर्टाने सरकारला ३ जानेवारी १९७६ ला कळविले. तेव्हा सरकारने २२ मार्च १९७६ ला कोर्टाला कळविले की निगेटिव्हसुद्धा गहाळ झाली आहे.

मार्च १९७७ मध्ये जनता सरकार अधिकारावर आल्यावर नहाटा यांनी त्या वेळचे माहितीमंत्री अडवानी यांच्याकडे अर्ज केला की माझ्या फिल्मचा शोध लावा किंवा ती नष्ट झाली असेल तर मला नुकसानभरपाई द्या. सी. बी. आय. च्या अधिकाऱ्यांनी २५ मे १९७७ ला मारुती लि. च्या आवारात छापा घालून फिल्मचे प्रिंट नष्ट करण्यात आल्याचा पुरावा गोळा केला. चोवीस-पंचवीस नोव्हेंबर १९७५ च्या रात्री फिल्मसंबंधीचे सर्व साहित्य गुरगाव येथील मारुती कंपनीच्या कारखान्याचे आवारातील आगीत नष्ट झाले असे सरकारपक्षातर्फे कोर्टात सांगण्यात आले होते; पण काही पुरावा नष्ट झाला, साक्षीदार फुटले यामुळे आरोप पुराव्याअभावी सिद्ध करता आले नाहीत.

आपल्यापुढे आलेल्या खटल्यातील सत्य शोधणे हे न्यायालयांचे मुख्य कार्य. गुन्ह्याची नोंद होऊ नये, नोंद झाली तरी तपास लौकर होऊ नये, पुरावा नष्ट करावा, साक्षीदार फोडावे, बनावट पुरावा तयार करावा असे प्रकार आपल्या बचावासाठी आरोपीतर्फे बहुतेक सर्वच खटल्यांत केले जातात. अशा सर्व प्रकारांना आळा बसेल तेव्हाच कोर्टाकडून केवळ पुराव्याचा न्याय न मिळता खरा न्याय मिळेल. त्या दिशेने आम्ही काही करणार आहोत का ?

□



# " अजी वकीलसाहब ! जरा सुनिये तो !...."

## ग्वालियर येथील वकील व पुलिस यांमधील संघर्ष

ॲडव्होकेट पु. ल. इनामदार

ग्वालियर हायकोर्टाची इमारत इंग्लिशमधील कॅपिटल E पद्धतीची तीन मजली आहे. तिसऱ्या मजल्यावर तीन हायकोर्टबेंच, दुसऱ्या मजल्यावर दोन हायकोर्टबेंच, तसेच डिस्ट्रिक्ट कोर्ट, ॲडीशनल डिस्ट्रिक्ट कोर्ट, रजिस्ट्रार हायकोर्ट व बाररूम आहे. तळमजल्यावर सिविल जजेस व मॅजिस्ट्रेटमहोदयांची कोर्टे व एक बाररूम आहे. याशिवाय लायब्ररी, रेकॉर्डरूम्स, कोर्ट–कार्यालये, प्रॉसिक्यूटर कक्ष वगैरे आहेत. E च्या मधल्या दांड्यांमध्ये रेकॉर्डरूम्स असून त्याला लागूनच पश्चिमाभिमुख न्यायिकबंदीकोष्ठ–ज्युडिशियल लॉकअप् आहे. त्याला उभ्या गजांचे मोठे दार, तसेच गजांच्या खिडक्या आहेत. कोर्ट–बिल्डिंगमध्ये पाठीमागील फाटकातून वकील, पक्षकार, कर्मचारी यांची ये–जा चालू असते. मधल्या अंगणामध्ये मोटारी, लॉरी, टांगे येऊ शकतात. बंदीकोष्ठाजवळ १५ फूट रुंदीची वाट सोडून पाठीमागच्या कम्पाउण्डला लागून सायकलस्टॅण्ड व कॅन्टीन, शौचगृहे वगैरे आहे. न्यायालयामधल्या सुनवाईसाठी त्या दिवसाचे बंदीगण केंद्रीय बंदिगृहातून लॉरीमधून मागच्या अंगणात आणून बंदीकोष्ठामध्ये १०॥–११ च्या सुमारास बंद केले जातात. कोर्टातून बोलावणे आल्यावर संबंधित बंद्याला बंदीकोष्ठामधून बाहेर काढून पुलिसपहाऱ्यात कोर्टात पोचवले जाते.

गुरुवार दि. २० मार्च ८० ची घटना. सकाळी ११ वाजता बंदीगण आणले जाऊन बंदीकोष्ठात बंद केले होते. अंगणामधून वकिलांची ये–जा चालू होती. दोन नवव्यवसायी तरुण वकील श्री. ज्ञानेश्वर गर्ग व श्री. एस. एस. कुशवाह–अंगणातून कोर्टाकडे जात होते. बंदीकोष्ठाच्या दारावर दोन पुलिसजवान पहाऱ्यावर उभे होते. इतक्यात बंदीकोष्ठामधून एका आरोपिताने हाक दिली, ' अजी वकीलसाहब ! जरा सुनिये तो ! ...' ती हाक ऐकून श्री. गर्ग यांनी त्याकडे वळून पाहिले व थांबून त्याचे म्हणणे ऐकण्याच्या अगोदरच त्या आरोपिताला ते म्हणू लागले होते, ' तू कोर्टात ये, तेथे आपण बोलू...वगैरे.' पण पहाऱ्यावरच्या जवानाने एकदम पुढे होऊन उर्मटपणे वकिलाला दटावण्यास आरंभ केला. ' आप पुलिसिपसे बात नहीं करेंगे, आप चले जाईये–! ' वकीलमहोदयांनी त्या जवानाला काही सांगण्याचा प्रयत्न केला तोच तो जवान वकिलांवर धावून आला व त्या वकिलाला काठीने मारावयास सुरुवात केली. प्रकरण सहाजिकच हातघाईवर आले. १०–५ आणखी वकील–पक्षकार धावून आले. एवढ्यात जवानांनी वकिलांवर काठीने व जोड्याने प्रहार केले होते.

जमलेल्या जमावाने जवानांना घेरून पकडले. त्या अभूतपूर्व घटनेमुळे उत्तेजित झालेल्या वकिलांनी ठरविले की, या जवानांना बाररूममध्ये घेऊन जाऊन बारच्या अध्यक्षमहोदयांसमोर उभे करावे. असे ठरून जमावाने जवानांना बाजूच्या व्हरांड्यात नेऊन जिना चढायला सुरुवात केली. जवान आपल्या पायांनी जिना चढेनात म्हणून जमावाने त्यांची उचलबांगडी करून वरती बाररूममध्ये नेले.

थोड्याच वेळात बार असोसिएशनच्या कार्यवाहक समितीचे बरेचसे सदस्य व काही वकीलवर्ग यांचा विचारविमर्श सुरू झाला. बाजूला दोन्ही जवान घड्याळाखाली भिंतीजवळ उकिडवे स्वस्थ बसून होते. तमासगीर बाररूममध्ये येऊ नयेत म्हणून बाररूमचे प्रवेशद्वार बंद करून घेतले होते. समितीमध्ये कोणी म्हणे, ' या लोकांनी आमची जाहीर माफी मागितली पाहिजे ! '...कोणी म्हणे, ' या जवानांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीच येथे येऊन आमची माफी मागितली पाहिजे ! ' कोणी म्हणे, ' आपण या जवानांना डिस्ट्रिक्टमहोदयांच्या कोर्टात नेऊन हजर केले पाहिजे. या जवानांनी कोर्टाच्या आवारात वकिलांना मारले आहे. हा न्यायालयाचा अपमान आहे.

डिस्ट्रिक्ट जजमहोदय यांचा निर्णय करतील...'

वकिलांची व समिती-सदस्यांची अशी पंचायत (पंचांचा वाद-विवाद) चालू झाली. उत्तेजित वातावरणात वादविवाद चालल्याने निर्णय लवकर ठरेना व वादविवादाचा घोळ वाढू लागला. घडलेल्या अघटित प्रकाराने हे सगळे अपरिहार्य होते.

अशा रीतीने वकिलांचा वादविवाद चालू असताना कोणी तरी – बहुधा प्रॉसिक्यूटरच्या ऑफिसमधून शहर कोतवालीमध्ये टेलिफोनवर बातमी सांगितली की, वकिलांनी पहाऱ्यावरच्या दोन जवानांना पकडून बाररूममध्ये बंद केले आहे – गंभीर तणावाची परिस्थिती आहे...वगैरे.

झाले ! पुलिस अधिकाऱ्यांची वरिष्ठ पातळीवरची चक्रे भराभर फिरली. वास्तविक बनाव काय व कुठे झाला याची अधिकृत माहिती अजून मिळाली नाही; पण प्रत्यक्षात एका पुलिस-लॉरीमधून ४–५ पुलिस-अधिकारी व १५–२० पुलिस-शिपायी लाठ्याकाठ्या, बंदुकी, रिव्हॉल्व्हर घेऊन कोर्टाच्या आवारात आले व मोटारीतून उतरताच 'काळा कोटवाला' जो दिसेल त्याला लाठ्यांनी मारायला पुलिसांनी सुरुवात केली. अंगणात उभ्या असलेल्या वकिलांना मारले. व्हरांड्यात चढून समोरच्या न्यायालयात काम चालले असता वकिलाला मारले. न्यायालयातल्या दोन कर्मचाऱ्यांना मारले, तेथे उभ्या असलेल्या पुलिसांच्या पैरोकार हेडमोहरिरलासुद्धा मारले ! जिन्याजवळ टेबलखुर्ची मांडून बसलेल्या दोन वकिलांना मारले. जिन्यावरून पहिल्या मजल्यावर जाऊन तेथे वकिलांना मारले. बाररूममधून बाहेर येत असलेल्या एका ६० वर्षांच्या वृद्ध वकिलाच्या डोक्यात लाठी हाणली ! कॅन्टीनमध्ये चहा पीत असलेल्या वकिलांना मारले.

या धुमाकुळात तीन वकिलांचे अस्थिभंग (बोन फ्रॅक्चर) झाले, तिघा वकिलांच्या डोक्यात जखमा झाल्या, १५–२० जणांना लाठ्यांचा मुकामार लागला. डोक्यावर लागलेल्या जखमांना टाके घालावे लागले. हातांना प्लॅस्टर बांधावे लागले.

कॅन्टीनमधल्या सामानाची उलथापालथ व मोडतोड झाली. न्यायालयातील टेबले-खुर्च्या अस्ताव्यस्त झाल्या. न्यायालयाच्या टेबलावर विटेचा तुकडा पडला. टेबलावर श्वेतबंद–ब्रॅण्ड–रक्ताने डागळलेला सापडला.

न्यायालयातले न्यायाधीश लगबगीने आपापल्या विश्रान्तिकक्षांमध्ये गेले. पक्षकार व कोर्टकारकून यांची पांगापांग झाली. चार–पाच न्यायालये ओस पडली !

एका वृद्ध वकिलाच्या डोक्यात लाठी लागण्याचे वृत्त कळून दोन हायकोर्ट जज–पूर्वाश्रमीचे ग्वालियर बारचे सदस्य–बाहेर येऊन पुलिसांना याचा जाब विचारू लागले. प्रथम त्यांच्याकडे शिपाई लक्षच देईनात. एक ऑफिसर त्यांच्याशी उर्मटपणे बोलू लागला. बोलताना कमरेच्या रिव्हॉल्व्हरवर हात ठेवून बोलू लागला. ते बघून एका हायकोर्ट जजमहोदयांनी ओरडून म्हटले. "अरे ! यह क्या कर रहे हो ? मैं हायकोर्ट जज्ज हूं ! ..."

विशेष उल्लेखाची गोष्ट अशी की, या धुमश्चक्रीत कुणाही शिपायाला अथवा पुलिसऑफिसरला कोण्याही वकिलाने अथवा अन्य कोणी मारल्याची आगळिक झाली नाही. तसेच ज्या जवानांना वकिलांनी पकडले होते त्यांना पुलिसअधिकारी आपल्या ताब्यात घेऊन जाईपर्यंत त्या दोघांच्या अंगावर कुठेही ओरखडा सुद्धा नव्हता हे दोन न्यायाधिशांनी स्वतः बघितले आहे.

हायकोर्टाजवळच असलेल्या इंद्रगंज पुलिसस्टेशनसमोर जमलेल्या जमावाला लाठ्याकाठ्यांचा मार पुलिसांनी दिला.

धुमाकुळाचे वेळी स्थानीय कलेक्टरमहोदय व एक वरिष्ठ पुलिस-ऑफिसर डिस्ट्रिक्ट जजमहोदयांच्या न्यायालयात येऊन बसले होते. 'आमचे कोणी ऐकत नाही !' या सबबीवर ह्या दोघांनी काही हस्तक्षेप केला नाही.

संध्याकाळपर्यंत ग्वालियर शहरात भीतिग्रस्त चेहेऱ्याचे लोक 'हे काय घडले ? आता काय होणार ?' अशा शंका-भयाने घरी जाणे श्रेयस्कर समजले. दुसरे दिवशी ग्वालियर शहरात स्वयंस्फूर्त असा सर्वव्यापी हरताळ झाला. बाजार-दुकाने बंद होती. भाजीवाले, इतर विक्रीयोग्य सामानाच्या हातगाड्या रस्त्यावर आल्या नाहीत. वाहने तुरळक धावत होती. रस्ते ओस पडले होते. न्यायालये ओस पडली होती. न्यायाधीश व कारकूनमंडळी स्वस्थ बसून होती. एकही वकील न्यायालयात हजर झाला नाही !

शनिवार, रविवार, सोमवारच्या सुटीनंतर मंगळवारपासून वकील-मंडळी न्यायालयात न जाण्याचा कार्यक्रम करीत आहेत. पक्षकार-लोक येतात चौकशी करून परत जातात. काम चालू होत नाही


## तीन राजहंस प्रकाशने

# आणि ड्रॅगन जागा झाला

**लेखक : अरुण साधू । मूल्य : चवदा रुपये**

# मॅक्झिम गॉर्की

**लेखिका : सुमती देवस्थळे । मूल्य : दहा रुपये**

# पूर्णिया

**लेखक : अनिल अवचट । मूल्य : सहा रुपये**

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

म्हणून न्यायाधीश व कारकूनमंडळी स्वस्थ बसून आहेत.

केंद्रीय गृहखात्याने दिल्ली हायकोर्टाच्या जजमहोदयांचे एक-सदस्यीय कमिशन चौकशीसाठी नेमले असल्याची घोषणा झाली आहे; पण प्रत्यक्षात अजून कशाचीच सुरुवात नाही.

केंद्रीय गृहखात्याकडून या घटनेला जबाबदार राष्ट्रीय स्वयंसेवक संघ असल्याबद्दलचा प्रचार सुरू झाला आहे. स्थानीय पुलिसअधिकाऱ्यांच्या कारवाया चालू आहेत. पकडलेल्या जवानाच्या अंगावर गंभीर जखमा असल्याचा डॉक्टरी रिपोर्ट तयार झाल्याची बातमी आहे. न्यायालयात ज्या कारकुनांनी मार सोसला त्यांच्याविरुद्ध इंडियन पिनल कोड कलम ३०७ अन्वये जिवे मारण्यासाठी हल्ला केला असा आरोप ठेवून केस तयार झाली आहे. अवास्तव घटनांचे भडकीले रिपोर्ट पुलिसडायरीमध्ये लिहिले जात आहेत—घटनांचे नवनवे साक्षीदार तयार होत आहेत.

पुलिसांच्या कर्मचारी संघाने आपल्या मागण्यांचा जाहीरनामा काढला आहे. दोषी वकिलांच्या सनदा जप्त करा, वकिलांना शिक्षा करा, दोन हायकोर्ट जजमहोदयांना ग्वालियरमधून बदली करा, पुलिस कर्मचाऱ्यांना संरक्षण द्या, पुलिसांच्या मागण्या लवकर पूर्ण झाल्या नाहीत तर पुलिस कर्मचाऱ्यांचा सार्वत्रिक संप चालू होईल अशी धमकीही आहे.

पुलिस शिपायी व ऑफिसरांच्या टोळीने, न्यायालयाच्या आवारामध्ये वकिलांवर मार देण्यासाठी हल्ला, गुरुवार दिनांक २० मार्च ८० ला दुपारी कोणाच्या आज्ञेने व काय करण्यासाठी केला, याचे कागदपत्र आहेत का? असल्यास ते कुणाजवळ याचा काही पत्ता नाही. या आक्रमक टोळीमध्ये कोण कोण शिपायी व ऑफिसर होते याची नोंद पुलिसस्टेशनडायरीमध्ये झाली आहे का? काही पत्ता नाही!

ग्वालियर शासनाने चार दिवसांनंतर दोन स्थानीय पुलिस-अधिकाऱ्यांना भोपाळ येथे नेले—पाठवले आहे. ते का याचा काही खुलासा नाही. त्यांना संरक्षण देण्यासाठी पाठवल्याची अफवा आहे.

या घटनेच्या संदर्भात होणारी चौकशी कार्यवाही शासकीय लालफितीच्या गुंत्यात सापडणार किंवा न्यायदानाच्या सर्वश्रुत दिरंगाईमध्येच बारगळणार अशी लक्षणे आताच दिसत आहेत.

प्रजातंत्रीय गणराज्याच्या संविधानामधल्या चार आधारस्तंभांपैकी एका स्तंभाने—शासकयंत्रणेने—दुसऱ्या आधारस्तंभावर म्हणजे न्यायालये व न्यायदानाला सहाय्यक असणाऱ्या वकिलांवर पाशवी आक्रमण केले असे दिसले आहे.

या न्यायालयांची व न्यायदानाला सहाय्यक असणाऱ्या वकीलवर्गाची दादफिर्याद कोण ऐकणार? या संघर्षासंबंधीचा न्यायनिर्णय कोण घेणार? दिवसाढवळ्या व जाणूनबुजून केलेल्या न्यायालयांवरील आक्रमणाबद्दल संबंधित विभागीय अधिकारी क्षमायाचनेचे नावही काढीत नाहीत. उलट न्याय मागण्याच्या नावाने न्यायाधिशांना व वकिलांना शिक्षा करण्याची मागणी करणाऱ्या व मागणी पूर्ण न झाल्यास सार्वत्रिक संपाची धमकी देणाऱ्या पुलिसअधिकाऱ्यांना संरक्षण देण्यासाठी पावले उचलीत आहेत.

भरघोस मताने निवडून दिलेल्या इंदिरा पार्टीचे शासन आम्हाला न्याय, स्थिरता, स्वस्ताई व निर्भयतेचे, व्यक्तिस्वातंत्र्याचे शासन देणार असल्याचे घोषित झाले होते तेच का हे शासन? □




# पुरे झाले आता हे स्वतःची कीव करीत रहाणे !

डॉ. शरद अभ्यंकर, वाई

'माणूस'च्याच काही आठवड्यापूर्वीच्या एका अंकात रंगीत टी. व्ही. वर टीका करणारा एक लेख आला होता. लोकांशी बोलतानासुद्धा अनेक जणांनी 'हॅं, इथं लोकांना खायला पोटभर मिळायची मारामार आणि रंगीत टी. व्ही. काय करायचा आहे ?' असे उत्स्फूर्त उद्गार काढले होते आणि बहुतेक कुठलाही चटकन फायदा न देणाऱ्या, खर्चिक, थोड्याफार चैनीच्या वाटणाऱ्या गोष्टींच्याबद्दल आपण असाच विचार करतो. या विषयाचा थोडा वेगळ्या पद्धतीने विचार करावा असे मी आज सुचवणार आहे.

एक-दोन उदाहरणे देतो. पहिले पुण्याचेच आहे. पुणे महानगरपालिकेतर्फे एक वातानुकूलित आधुनिक नाटचगृह उभारावे अशी सूचना आली होती. वरीलप्रमाणेच 'हं, इथं लोकांना खायला पोटभर......' ही प्रतिक्रिया तात्काळ झाली. याशिवाय 'पुण्यात अशा किती नाटके होणाराहेत ?' 'इतक्या सुंदर हवेच्या शहरात एअर कंडिशनिंग हवेच कशाला ?' 'इथलं भाडं बिचाऱ्या नाटक कंपन्यांना परवडेल का ?' 'मग तिकिटं किती महाग ठेवावी लागतील ?' इथपासून 'काही दिवसांनी थिएटरचे गोडाउन करावे लागेल गोडाउन ! अशा खास खवचट पुणेरी अभिप्रायांची आतषबाजी झाली. सुदैवाने हे नाटचगृह उभारले गेले. आज तिथे रोज १–२ नाटके होतात आणि हाउस फुल्लही जातात.

दुसरे उदाहरण आहे रेलवेचे. विशेषतः प्रा. दंडवते रेल्वेमंत्री झाल्यावर दूर अंतरावरच्या वेगवान आणि उत्तमरीत्या सजवलेल्या, सर्व सुखसोयींनी युक्त अशा बऱ्याच गाड्या भारतात सुरू करण्यात आल्या. नेहमीप्रमाणे 'भारतासारख्या दरिद्री देशाला या सुपरफास्ट गाड्या करायच्यात काय?' अशी टीका झालीच. अशी टीका करणाऱ्या काही पत्रांना एका नियतकालिकाच्या वाचकाने फार सुरेख उत्तर दिले होते. ते असे : 'आपला देश जरी मागासलेला असला तरी विकसनशील देशांमध्ये तो आता सर्वांत पुढारलेला आहे. त्यामुळे भारताच्या प्रगतीकडे हे देश मोठ्या आशेने आणि काही शिकण्याच्या अपेक्षेने पहात असतात. त्यामुळे अपवाद म्हणून नव्हे तर नित्याच्या म्हणून अशा उत्कृष्ट गाड्या भारतात असणेच आवश्यक आहे.'

मला वाटते हा फार मार्मिक आणि विचारात घेण्यासारखा मुद्दा आहे. आम्ही दरिद्री, आम्ही मागासलेले हे नामर्दपणाचे आणि निष्क्रिय बनवणारे विचारच आता आपण सोडून द्यायला पाहिजेत. सुदैवाने आता अशा विचारपरिवर्तनाला परिस्थितीही अनुकूल आहे. एवढ्या मोठ्या कृषिप्रधान देशाने अन्नधान्यासाठी दुसऱ्यावर अवलंबून रहाण्याचे दिवस आता भूतकाळात जमा झाले आहेत. नैसर्गिक आपत्तींना तोंड देऊनही आपण धान्याची गरज पुरी करू शकतो, भारतीय शेतकरी नव्या पद्धती आणि शस्त्रे आत्मसात करून जागतिक विक्रम करू शकतो हे आता सिद्ध झाले आहे. पुरेसा पाणीपुरवठा, सेंद्रिय खते, सुधारित बियाणे आणि कीटकनाशके यांचा सर्वत्र उपयोग केल्यास भारत हा एक मोठा धान्यनिर्यातदार देश बनू शकेल यात शंका नाही.

औद्योगिक उत्पादनात भारताचा दहावा क्रमांक लागतो. इलेक्ट्रॉनिक कॅल्क्युलेटरपासून जेटविमानापर्यंत सर्व प्रकारचे उत्पादन भारतात होते. मालवाहू जहाजाच्या क्षमतेत आपला १५ वा क्रमांक आहे. यांत्रिकी मालाची भारताची निर्यात वाढते आहे. जपानचा अपवाद वगळता आशियातील इतर देशांपेक्षा आपण आधुनिक तत्त्वज्ञानाच्या बाबतीत प्रचंड आघाडी मारली आहे, अगदी चीनपेक्षाही. आपले हजारो तंत्रज्ञ आज जगभर आपले कर्तृत्व गाजवीत आहेत.

या सर्व प्रगतीचे लोण आता आपल्या खेड्यापाड्यांतून पोचले पाहिजे. नव्हे तसा आपण आग्रह धरून प्रयत्न केला पाहिजे. 'खेडेच ते. तिथे इतपत गैरसोयी असणारच !' किंवा 'इतक्या सगळ्या गोष्टी असायला ही काय मुंबई थोडीच आहे ?' हे विचार आता सोडून दिले पाहिजेत. आमच्या खेड्यातही या सर्व आधुनिक सुखसोयी आम्ही पोचवणारच या जिद्दीने आता नियोजन करायला पाहिजे. पुढील पाच वर्षांत प्रत्येक खेड्यात पुढील सुविधा तरी उपलब्ध व्हायला हव्यात.

१. **पक्का रस्ता** : खेडे म्हटले की रस्ता हमखास खाचखळग्यांचा, धुळीचा, ओढ्या-नाल्यांवर पूल नाही, हे आता चालणार नाही. प्रत्येक खेड्याचा जवळच्या शहराशी आणि आसपासच्या खेड्यांशी पक्क्या रस्त्याने संपर्क साधला गेला पाहिजे. या योजनेमुळे अनेक शेतमजुरांना हंगामविरहित काळात काम मिळू शकेल.

२. **एस्. टी.** : रस्ता तिथे एस्. टी. हे ध्येय एस्. टी. ने साध्य केले आहे. आता गाव तिथे एस. टी. असे झाले पाहिजे. एस. टी. सुरू होताच एकेका गावाचा चेहरामोहरा बदलतो. यातूनही अनेकांना काम मिळू शकेल. एस्. टी. लाही फायदाच होईल.

३. **पिण्याचे पाणी ( नळाने )** : याचा सर्वांत मोठा फायदा हा की अनेक जलप्रसारित (Water borne) रोगांना आळा बसेल. लाखो मॅनअवर्स वाचतील. दूरवरून पाणी आणावयाचेही मॅनअवर्स वाचतील.

४. **पोस्ट आणि टेलिफोन** : पोस्टखाते खूपच सर्वदूर पसरले आहे. या प्रत्येक पोस्टात फोन असलाच पाहिजे. फोन ही आता चैनीची बाब राहिली नाही; पण अद्याप आपल्याकडे फोन स्वस्त उपलब्ध करून देऊन त्याचा प्रसार वाढवण्याच्या योजना नाहीत.

उलट दिवसेंदिवस तो महाग होऊन सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर जातो आहे. फोनची फी एकपंचमांश केली तर त्याचा विस्तार दहापट होईल आणि फोनखात्याचा फायदाच होईल. त्या दृष्टीने धाडसी आणि आक्रमक योजना आखल्या पाहिजेत. यात लाखो लोकांना रोजगार उपलब्ध होईल.

५. टी. व्ही. : लवकरच उपग्रहामार्फत सर्व भारतभर टी. व्ही. दिसू लागेल. ही योजना शक्य तो लवकर कार्यान्वित झाली पाहिजे. प्रत्येक खेडयात एक तरी टी. व्ही. संच, रंगीत प्रक्षेपण सुरू झाल्यास रंगीतच पाहिजे. आज ना उद्या रंगीत टी. व्ही. होणारच. तो आताच केलेला फायदेशीर ठरेल. सुरुवातीच्या काळात रंगीत टी. व्ही. च्या प्रक्षेपणाचा खर्च आणि संचाची किंमत प्रचंड असे. आता या दोन्हीतही खूप कपात झाली आहे. तांत्रिकदृष्टया आपण हे पाऊल टाकायला निश्चित तयार आहो. अडथळा आहे तो आपल्या भीतिग्रस्त कल्पनांचा आणि न्यूनगंडाचा. हा गंड शक्य तो लवकर निपटून काढायला हवा.

६. दवाखाना : WHO तर्फे आलेली फिरती रुग्णालये भारतातील खेडयांतून फारच उपयोगी ठरतील. अशी आपल्याकडेच बनवून सर्वत्र उत्कृष्ट वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देता येतील. डॉक्टरही मग खेडयात जायला नाखूष रहाणार नाहीत. ३ वर्षांच्या कोर्ससारखे कोर्स काढून नर्सेसपेक्षाही कमी शिक्षण झालेले डॉक्टर मग खेडयांवर लादावे लागणार नाहीत. जरूर पडल्यास पूर्वीच्या LCPS सारखा एखादा कोर्स प्रत्येक जिल्ह्याच्या गावी सुरू करता येईल.

७. शाळा : अद्यापही अनेक खेडयांत एकशिक्षकी शाळा देवळात वा उघडयावर भरतात. शाळेची स्वतंत्र इमारत आणि उत्तम शिक्षक पाहिजेतच. या शिक्षकांना सर्व सोयी आणि उत्तम पगार दिल्यास अनेक तरुण हे काम पत्करतील.

८. वीज : अद्यापही महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात १०० टक्के विद्युतीकरण व्हायला ३ वर्षे लागतील. हे काम लांबता कामा नये. अद्याप युरोपमध्ये काही खेडी वीजपुरवठा नसणारी आहेत. भारताने या क्षेत्रात विक्रम केलाच पाहिजे. अणुविद्युतकेंद्रांना धोकेबाज मानण्याचे काहीच कारण नाही. पाश्चात्य देशांत लोकांना अणुशक्तीबद्दलच्या अनाठायी भीतीने ग्रासले आहे. त्यामुळे त्यांची प्रगती मंदावत आहे. आपल्याला याच संधीचा फायदा घेऊन त्यांच्यापुढेही मजल मारता यईल. भारतात मुबलक उपलब्ध असणाऱ्या थोरियमपासून अणुशक्ती मिळवणे अवघड नाही. तसें झाल्यास तेल आणि वायूचे साठ जास्त दिवस पुरवता येतील.

९. लघुउद्योग : इन्स्टिटयूट ऑफ कल्चरल अफेअर्स या परदेशी स्वयंसेवकाच्या संस्थेने साताऱ्याजवळच्या एका खेडयात बेकरी, पापडाचा कारखाना आणि विटांची भट्टी सुरू करून गावातील २०० निरुद्योगी स्त्रीपुरुषांना रोजगार पुरवला. यात परदेशी मदत एक पैसाही नव्हती. संकरित गोपालन, मधुमक्षिकापालन, कुक्कुटपालन, वराहपालन, मत्स्योत्पादन, मेंढीपालन असे अनेक व्यवसाय त्या त्या ठिकाणच्या गरजेनुसार सुरू केले पाहिजेत. याबाबत मार्गदर्शन करणाऱ्या शेतकऱ्यांच्याच सहकारी संस्था उभारल्या पाहिजेत. 'मागेल त्याला त्याच्या गावात काम' अशी घोषणा प्रत्यक्षात आणली तर मुंबईला जाणारा लोंढा थांबवता येईल.

१०. तालीम : आजकाल ही संस्था नष्टप्राय होऊ पहात आहे. थोडे व्यायामाचे साहित्य, कुस्तीचा हौदा अशी तालीम प्रत्येक खेडयात पाहिजेच. शिवाय कबड्डी, खोखो किंवा व्हॉलीबॉल यांसारख्या खेळांकरिता मैदानेही.

११. मिनी थिएटर : खेडयात करमणूक अशी नसतेच, ८ मि. मी. फिल्म दाखवणारी छोटी थिएटर्स अल्प खर्चात उभारता येतात. त्यांचा प्रसार सर्वदूर झाला पाहिजे.

१२. वाचनालय : अद्याप अनेक खेडयांत रोजचे वृत्तपत्रही जात नाही. महाराष्ट्र शासनाची साखळी-ग्रंथालय योजना आहे; पण त्याला फारसा प्रतिसाद नाही. 'गाव तिथे वाचनालय' हे ध्येय सफल करण्याकरता प्रयत्न झाले पाहिजेत.

१३. सार्वजनिक गोबरगॅस : शेणाच्या गोवऱ्या करून त्या जाळणे म्हणजे नोटा जाळण्यासारखे आहे हे शेतकऱ्यांना पटवले पाहिजे. रासायनिक खतांपेक्षा शेणखत जास्त उपयुक्त आणि जमिनीचा नाश न करणारे असते. शिवाय अतिशय स्वस्त. अशा सार्वजनिक गोबरगॅस प्लँटचा प्रयोग कर्नाटकात खूपच यशस्वी झाला आहे. या गॅसवर गावातल्या रस्त्यातील दिवे, विहिरीवरील पंप, पिठाची गिरणी इ. चालून घरोघरी स्वयंपाकाकरता गॅस पुरवता येतो. शिवाय उत्तम खत मिळते. पोल्यूशन म्हटले की आपल्या डोळयांपुढे गिरण्यांची धुराडी येतात; पण खेडयापाडयांतून जाळल्या जाणाऱ्या रानशेणामुळे आणि लाकडांमुळेही कार्बन डायॉक्साइड, मोनॉक्साइड आणि धूर यांचेमुळे प्रचंड पोल्यूशन चालू असते. स्त्रियांना धुराचा त्रास कोंदटलेल्या स्वयंपाकघरात किती होतो याची शहरात कल्पना येणार नाही. इथे स्वच्छ, कार्यक्षम गॅसवर स्वयंपाक होऊ लागला तर क्रांतीच होईल. हे सर्व करणे आपल्याला अवघड नाही. भारतात सर्वांत जास्त गुरे आहेत. ही अफाट संपत्ती आपण करंटे लोक अक्षरशः मातीत घालवत आहो. प्रत्येक जनावराच्या शेणाचा गॅससाठी उपयोग झाला तर भयानक वेगाने होणारी झाडीतोड रोखता येईल. परिसर हिरवागार होईल. पावसाचे मान सुधारेल. जनावरांना चारा मिळेल. देशाचे चित्रच पालटून जाईल.

१४. बँक : खेडयातील आर्थिक परिस्थिती सुधारण्यास तिथे बँकांची जरूरी लागेल. या बँका थोडया वेगळया प्रकारच्या असतील. स्त्रियांनी चालवलेल्या या बँकातील कर्मचारी हेल्थ व्हिजिटरप्रमाणे घरोघर जाऊन घरातील स्त्रियांकरवीच बँकिंगचे व्यवहार करतील. खैरा जिल्ह्याचा कायापालट तिथल्या स्त्रियांनी शिल्लक टाकलेल्या दुधाच्या पैशांतून झाला हे आपल्याला ठाऊक आहेच.

हे सर्व झाल्यास कोणीही शिक्षक, डॉक्टर वा बँकअधिकारी खेडयात जाण्यास नाखूष रहाणार नाही. उलट परदेशाप्रमाणे शहरात कामाला येऊन रहायला बाजूच्या खेडयात जाणे लोक पसंत करतील.

खेडयातच इतकं सर्व झाल्यावर तालुक्याच्या गावी राहीलच कोण असे तुम्हाला वाटेल; पण तालुक्यांच्या गावांतूनही अनेक गोष्टी व्हायला पाहिजेत. त्या अशा–

१. शेतीशाळा : भारतात ८० टक्के लोक शेतीवर उपजीविका करतात. साहजिकच ८० टक्के शिक्षणसंस्था शेतीचे शिक्षण देणाऱ्या हव्यात. आज काय दिसते ? ८ टक्के सुद्धा शेतीशिक्षणाच्या संस्था

नाहीत. शेती हा अडाणी किंवा इतरत्र बुद्धी न चालणाऱ्या लोकांनी करायचा व्यवहार ही वृत्ती सोडून द्यायला पाहिजे. प्रत्येक तालुक्याच्या गावीच नाही नाही तर मोठ्या खेड्यांतून सुद्धा शेतीचे शिक्षण देणाऱ्या आणि इतर उपव्यवसाय शिकवणाऱ्या संस्था हव्यातच. आर्टस आणि कॉमर्स कॉलेजे पुरे झाली. आमच्या खेड्यांतला विद्यार्थी जिवापाड मेहनत करून B·com होतो. मग त्याला शेतीत गोडी वाटत नाही आणि त्याच्या इच्छेप्रमाणे राष्ट्रीयीकृत बँकेत नोकरी मिळत नाही. पडली सुशिक्षित बेकारात भर! 'उपजीविकेकरता शिक्षण' हेच मुख्य ध्येय हवे.

**२. तांत्रिकी शाळा :** आज ITI सारख्या धंदेशिक्षणशाळा फक्त जिल्ह्याच्या ठिकाणी आहेत. त्या तालुक्यात हव्यात आणि त्यात अनेक उपयुक्त असे लहान लहान कोर्सेस हवेत. गवंडी, सुतार, प्लंबर, वायरमन, ड्रायव्हर्स आणि असेच असंख्य कुशल व्यावसायिक आज मिळत नाहीत. इथेच नव्हे तर परदेशांतही. आपल्याकडे मनुष्यबळ पुष्कळ आहे. असे लोक तयार करून मध्यपूर्वेत वा पाश्चिमात्य देशांना पुरवण्याचे काम आपला देश करू शकेल. आज अनेक नर्सेस आणि तंत्रज्ञ परदेशांतून भारतातील परदेशी गंगाजळीत भर घालीतच आहेत. हेच काम जास्त व्यवस्थित आणि कार्यक्षमरीत्या करता येईल. जगाच्या पाठीवर कुठेही, कुठल्याही विषयातले तज्ज्ञ आणि तंत्रज्ञ पाठवू शकणारा भारत हा देश होऊ शकेल. Brain Drain होतो आहे म्हणून रडत बसण्याऐवजी आपण Brain Export करून देशाचा फायदा करून देऊ या!

**३. शीतगृहे व साठागृहे :** सध्या थोड्याफार शीतगृहांचा फायदा मोठ्या व्यापाऱ्यांना होतो. साठागृहे तर कुठे नाहीतच. शेतकऱ्यांना यात माल साठवून योग्य भाव येईल तेव्हा विकता आला पाहिजे. बँकांनी हे काम करून अल्पभाड्यात शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावे.

**४. दूध डेअरी :** संकरित गायींचा पुरेसा प्रसार झाल्यास प्रत्येक तालुक्याच्या गावी चिलिंग प्लँट किंवा संपूर्ण डेअरी उभी करणे अवघड नाही. मात्र यासाठी गोवधबंदी वगैरे खुळचट कल्पना सोडून देऊन शास्त्रीयरीत्या गोपालन केले पाहिजे.

**५. हॉस्पिटल आणि ब्लड बँक :** अनेक वैद्यकक्षेत्रातील विशेषज्ञ आज शहरात गर्दी करून आहेत. त्यांना तालुक्याच्या गावी योग्य सुविधा पुरविल्यास ते आनंदाने तिथे काम करतील. ब्लड बँक उभारण्यात मुख्य अडचण स्वतःहून रक्त देणाऱ्यांची असते. त्याकरता सुरुवातीला कॉलेज वा ITI च्या विद्यार्थ्यांना रक्तदान सक्तीचे करावे लागेल.

**६. भुयारी गटारे :** स्वच्छतेचा प्रसार आणि रोगराईला प्रतिबंध याकरता भुयारी गटारे अत्यावश्यक आहेत. यातील सांडपाण्यावर भाजीपाला, खत व गॅस करता येईल.

**७. एक तरी मोठा कारखाना :** प्रत्येक तालुक्याच्या गावी उभारला जाईल हे पाहिले पाहिजे. त्या अनुषंगाने अनेक छोटे कारखाने उभे राहतील.

**८. क्रीडांगण आणि पोहोण्याचा तलाव :** मैदानी सामने भरवता येतील असे क्रीडांगण, पोहोणे हा विषय शाळांतील विद्यार्थ्यांना ठेवून सर्वांना पोहता येते आहे अशी वेळ लवकरच आणता येईल.

९ : **रेल्वे :** प्रत्येक तालुक्याच्या गावी रेल्वे हे असेच अवास्तव स्वप्न वाटेल; पण थोडा विचार करा. भारतात कोळशाचे साठे विपुल आहेत. मालवाहतूक डिझेलवर चालणाऱ्या ट्रकने करणे जास्त जास्त महाग होत जाणार. कोळशापासून पेट्रोल करायची सोपी युक्ती सापडली तर हे पुढे परवडेल. अन्यथा कोळशावर चालणारी गॅसप्लँट ट्रकना बसवावी लागतील. त्यापेक्षा अद्याप unrapped असणारी जलविद्युत्, अणुविद्युत् आणि कोळसा यावर चालणाऱ्या रेल्वेचे जाळेच आपल्याला वाचवू शकेल. त्याकरता आतापासून रेल्वे उभारायला लागले पाहिजे.

## आता जिल्ह्याच्या ठिकाणी

**१. औद्योगिक प्रकल्प :** एक तरी मोठा राष्ट्रीय उद्योग प्रत्येक जिल्ह्याच्या गावी उभारला गेला पाहिजे. या उद्योगाला आवश्यक असणारे तंत्रज्ञान देणारी संस्थाही तिथेच पाहिजे.

२. एखाद्या विशिष्ट तांत्रिक शाखेचे ज्ञान देणारी खास मोठी संस्था उदा. इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर सायन्स, शुगर टेक्नॉलॉजी, टेक्स्टाइल इंजिनिअरिंग, T. V. इ. त्या त्या प्रदेशानुसार आवश्यक अशी त्या जिल्ह्यात उभारता येईल.

३. रेडिओकेंद्र : स्थानिक बातम्या, हवामान, शेतकऱ्यांना उपयुक्त माहिती, लोकशिक्षण आणि स्थानिक कलावंतांना उत्तेजन हे सर्व हेतू या केंद्राद्वारे साध्य होतील.

**४. विमानतळ :** विमानप्रवास ही आता चैनीची गोष्ट राहिलेली नाही. त्यामुळे लहान विमाने उतरू शकतील अशी एअर स्ट्रिप बनवून त्यावर वैमानिकांच्याच सहकारी गटांना खाजगी वाहतुकीचे परवाने देता येतील. आज शेकडो वैमानिक बेकार आहेत त्यांना काम मिळेल. याच एअर स्ट्रिपवर एरवी ग्लायडिंग सेंटर किंवा फ्लाईंगक्लब चालवता येईल. त्यातून नवीन वैमानिक तयार होतील.

या सर्व गोष्टी करणे सहज शक्य आहे. फक्त आम्ही मागासलेले आमच्या दरिद्री देशाला हे कसे परवडणार असले रडेपणाचे विचार आधी समूळ निपटून काढायला पाहिजेत आणि आम्ही हे निश्चित करून दाखवूच अशा दृढ आत्मविश्वासाने कामाला लागले पाहिजे. □


मान्यता पावलेला चरित्रग्रंथ

**टॉलस्टॉय – एक माणूस**

दुसरी आवृत्ती । लेखिका : सुमती देवस्थळे । मूल्य : पंचावन्न रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ४११ ०३०

# नायगारा नायगारा नायगारा !

सौ. माधुरी बापट, स्प्रिंगफील्ड (अमेरिका)

लहानपणी केव्हा तरी, बहुधा सातवीमध्ये असताना–म्हणजे नको त्याच वयात-मेरिलिन मन्रोचा 'नायगारा' सिनेमा पाहिला होता. तेव्हा जगातलं हे आश्चर्य 'ह्याचि देही ह्याचि डोळा'–या जन्मात आपण पाहू शकू असं काही वाटलं नव्हतं; पण हे न पडलेलं स्वप्न खरं होण्याची लक्षणं दिसू लागली, तसा मनस्वी आनंद झाला. मुळात मला प्रवासाची आवड ! नौरोजी म्हणतात 'उंडारायची' काही असो; पण अमेरिकेत येऊन वर्ष झालं होतं नि रोजच्या त्याच त्या कृत्रिम जीवनाला मन नी शरीर उबून गेलं होतं. स्वैपाक, भांडी धुणे, स्वच्छता, लाँड्री, ग्रोसरी, टी. व्ही. वीक एन्ड–ह्या चक्रातून जळमटलेलं मन नी शरीर जरा निसर्गाच्या सान्निध्यात झटकून कात टाकलेल्या सापाप्रमाणं चकचकीत नि ताजंतवान होण्यासाठी मी अगदी उत्सुक झाले होते.

मग त्याप्रमाणं तयारीला सुरुवात केली. जुलैमधला तिसरा आठवडा म्हणजे उत्तमच ! अगदी ऐन उन्हाळा ! जास्त कपडे घेण्याची कचकच नाही. तरीपण आवश्यक कपडे, औषधे, खाण्यापिण्याच्या भरपूर वस्तू यांनी बॅगा भरल्या. कारण उन्हाळा म्हणजे सारखी तहान–तहान ! थर्मोकूलची पेटी भरून बर्फ नि कोकच्या दोन–चार कॅन्स !

कारला एकदा तिच्या डॉक्टरकडे दाखवून आणले. तशी नवीच, पण काय सांगा–ऐनवेळी आजारी-बिजारी पडली तर ! कारण गाळात निघालेल्या क्रायस्लरचे अपत्य ! तशी कार मैलेज चांगले देते; पण एकूण अशक्यच ! अशक्त हृदयाच्या माणसाला क्रॉस कंट्री करायला लावण्यापैकी ! पाऊस पडला की नाडीचे ठोके कमी होतात, 'बंद पडते' असं कसं म्हणायचं ? बादशहासमोर 'पोपट मेलाय्' कसं म्हणायचं–तशापैकी. शिवाय कार वातानुकूलित नाही व इमर्जन्सीमध्ये उपयोगी पडणारा C. B. रेडिओ पण नाही. त्यामुळं एवढ्या लांब पल्ल्याची ट्रिप तिच्यावर करायची जरा धाकधुकच होती.

ट्रिपसाठी लागणारे आवश्यक नकाशे, माहिती AAA (अमेरिकन ऑटोमोबिल असोसिएशन) मधून घेतली. ती व्यवस्थित अभ्यासली. कारण नायगाऱ्यात पोचायची अर्धी जबाबदारी माझ्यावरच होती. ड्रायव्हिंग नौरोजी करणार; पण 'नेव्हिगेशन' मलाच करायचे होते. इथे काही इंडियासारखे नाही. चाललेत आपले वाटेत रस्ता विचारत विचारत ! चुकलाच तर हायवेवर पण धडाधड 'यू टर्न' घेताहेत. मला एकदा कोकणातली आठवण आली. वेळणेश्वर किती अंतरावर विचारलं तर 'हे आलंच एक कोसावर !' असं झपाट्यानं चालणाऱ्याचं उत्तर ! पण १५–२० मैल गेले तरी कोस सपायची चिन्हं नाहीत नि शॉर्टकटस् घेणारा तो पदयात्री आमच्यापुढे !

सगळी तयारी झाली नि कशानं कोण जाणे पण नौरोजींचा मूडच गेला ! आता कारण विचाराल तर ओहायोत किंवा अमेरिकेतच पाऊस का पडतो–म्हणण्यासारखं ! मेक्सिकोतून गरम हवा येते, कॅनडातून थंड हवा येते मग वादळ, विजा, पाऊस ह्याला काय तोटा ! नायगाऱ्याचा बेत फिसकटण्यापर्यंत वेळ आली; पण थोडक्यात बचावले. नकटीच्या लग्नाला...तसंच ! शेवटी जायचं नक्की झालं नी रात्री बारापर्यंत जागून ढिगलाभर सँडविचेस करून ठेवली.

निघायच्या आधी फोडायला कधी नव्हे तो ग्रोसरी स्टोअरमध्ये

सारळ मिळाला; पण तो निघाला (नेहमीप्रमाणे) कुजकाच ! पण श्रद्धाळू मन म्हटलं–म्हणजे यश नक्की !

आणि उगवत्या सूर्याला साक्षी ठेवून एकदाचा ट्रिपचा श्रीगणेशा झाला. शहराबाहेरची मोकळी हवा लागली तसं मन कसं पिसासारखं हलकं हलकं झालं. छातीभरून श्वास घेतला नि त्याचीच झिंग आली.

'अगं ए, आता पुढचा रस्ता सांग !' ह्या वाक्याने तोंडावर पाण्याचा सपकारा बसावा तशी तंद्रीतून खडबडून जागी झाले नि नकाशावर बोट ठेवून पुढचा रस्ता पाहू लागले. I 68 South संपला होता नि I 70 East घ्यायचा होता. ईस्ट व वेस्टचं जंक्शन आलं. परत गोंधळ. ५५–६० मैलाच्या वेगात असताना जरा जरी पाटी वाचायची चुकली तरी परत पुढचं Exit घेऊन बरोबर रस्त्यावर यायला १०–१५ मैलांचा फटका !

बाकी अमेरिकेतल्या रस्त्यांना आपण मानलं. इथलं सगळं जीवनच कार्स, ड्रायव्हिंगवर अवलंबून ! नव्या माणसाला सुरुवातीला जरा बावचळल्यासारखं होतं खरं; पण एकदा का इथल्या रस्त्यांचे गुपित कळलं नि वेगात असतानाही पाटचा वाचायची सवय झाली की ड्रायव्हिंग नि प्रवास यात गंमत वाटायला लागते. इथले रस्त्यांचं नकाशेही इतके बिनचूक असतात व अगदी लहान लहान रस्तेही इतक्या सोप्या तऱ्हेने दाखवलेले असतात की नकाशा पाहून रस्ता दाखवण्यातही गंमत वाटते.

I 70 E संपत आला होता नि आम्ही ओहायोच्या राजधानीजवळ आलो होतो. ह्या 'कोलंबस' भोवती रस्त्यांचे जाळेच आहे. जरा चुकलात की चक्रव्यूहात अडकलात ! मग 'कोलंबस' भोवती गोळं फिरतच बसायला होतं. अमेरिकेत बहुतेक सर्व मोठ्या शहरांभोवती असेच 'जाळे' असते. 271 North संपवून 71 North ला लागलो तसे चक्रव्यूहातून बाहेर पडल्याचा–सुटकेचा निःश्वास सोडला. आता क्लीव्हलँडपर्यंत हाच रस्ता सरळ होता.

घरातून निघून तास झाला होता नि सर्वांच्या पोटात कावळे ओरडायला लागले होते. एकीकडे ड्रायव्हिंग करत असतानाच दुसरीकडे बायकोने भरवलेल्या सँडविच नि गरमागरम चहाचे घुटके घेणं नौरोजींना अगदी आवडत होतं. एरवी रोजच फॅक्टरीत थंडगार सँडविच खावं लागतं; पण प्रवासाच्या वेगळ्या वातावरणात सँडविचची नवी नि खरी चव कळली होती नि वीर चक्क हाणत होते.

बाबांना ड्रायव्हिंग करताना नि आईला नेव्हिगेशन करताना त्रास नको म्हणून आमची छोटी ३ वर्षांची छोकरी बिचारी एकटीच मागच्या सीटवर पट्टा बांधून बसली होती. आपणा भारतीयांना एकूणच मुलांविषयी माया, प्रेम, कणव जरा जास्तच ! अमेरिकन मुलं कशी एकेकटी वाढतात. त्यांनाच आईबाप नको असतात. काही असो आईविना एकटं बसलेलं लेकरू भुकेनं व्याकुळ झालं असेल ह्या कल्पनेनं माझाही पट्टा सावरत–मोठी सर्कसच करत–तिच्याकडे पाहिले मात्र–तर बाईसाहेब 'बबलगम'मध्ये रमलेल्या ! आपली मुलंही इकडे रुळायला वेळ लागत नाही तो असा !

कुठेही वळण नसलेला सरळच्या सरळ रस्ता–होता मात्र अगदी शोभिवंत ! सूर्यही डोळ्यांवर येत नसल्याने मजा वाटत होती. तसा रस्ता सपाट नव्हताच. सारखे चढ–उतार ! पण त्यामुळेच गंमत वाटत होती. दूरवरच्या गाड्याही दिसत होत्या; पण मधल्याच खोलगट भागामुळे रस्ता एकदम कुठे तरी हरवल्यासारखाच वाटत होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूंची देखणी गर्द झाडी पाहून एक गोष्ट एकदम कळून चुकली.

## सुरेख हिरवळ

भारतात असताना उगीचच अशी कल्पना होती की इथे जंगले, झाडी बहुधा नसतेच. सगळी अमेरिका ही मुंबईसारखीच फक्त इमारती व रस्त्यांनीच व्यापलेली असावी असे वाटे; पण ह्या कल्पनेला ससाक्ष तडा गेला. तसं भूगोलात वाचून थोडीफार कल्पना होती की, अमेरिका अजूनही २/३ जंगलानेच व्यापलेली आहे; पण ते ज्ञान पुस्तकीच होते. प्रत्यक्ष जेव्हा आकाशाशी स्पर्धा करणारी उत्तुंग वनश्री पाहिली तेव्हा सर्वच गोष्टींमध्ये एका टोकास पोचलेली अमेरिका ह्याच बाबतीत कशी बरं मागं राहील असं वाटलं.

दर १०–१५ मैलांच्या टप्प्यावर Food-Gas–Rest Area अशा पाट्या दिसत होत्या. चांगल्यापैकी काही नाही पण आवश्यक तेवढ्या गोष्टी तिथे उपलब्ध असतात. कारसाठी गॅस नि माणसांसाठी व्हेंडिंग मशिन्स नि रेस्टरूम्स् ! ह्या Rest Area असतात मात्र सुरेख ! गर्द झाडीमध्ये सुरेख हिरवळ ! प्रवाशांना माहिती देणारे छोटेसे ऑफिस ! एखादी छोटी पिकनिक काढायला अगदी फिट्ट जागा ! विशेषतः दुपारच्या कडक उन्हामध्ये अशी जागा म्हणजे ओॲसिसच वाटावे. अशा ठिकाणच्या रेस्ट रूम्स् पाहून मात्र क्षणभर आपण अमेरिकेत नसून पुणे–सांगली रस्त्यांवरील सातारा, कराडच्या एस. टी. स्टँडवरील रेस्टरूममध्ये आहोत की काय, असं वाटलं. एकूण अमेरिका काय किंवा भारत काय, सार्वजनिक ठिकाणच्या अशा जागा नि मुळातला माणूस हा जगात कुठेही गेला तरी सारखाच नाही का ?

आमच्याबरोबर कारच्या पोटातही गॅस भरून, जरा पाय मोकळे करून, उगीचच चार-दोन स्नॅप मारून आम्ही पुढचा रस्ता सुधारला. कारण मावळायच्या आत नायगाऱ्याला पोचणे इष्ट होतं. तशी नौरोजींनी गाडी चांगली पळवली होती. मुख्य म्हणजे हवा छान होती. उगीच पाऊस वगैरे नव्हता नि कडक ऊन्ह पण नव्हते. कृपाच म्हणायची ! असा 'Sunny day', 'Beautiful day' अमेरिकेत आल्यापासून क्वचितच अनुभवला होता. एक तर वर्षातले सहा महिने बर्फ नि बर्फ नसेल तेव्हा पाऊस !

क्लीव्हलँड जवळ येऊ लागलं, तशी वर्दळ खूपच वाढू लागली नि जवळजवळ आता लंचटाइम असल्याने तर फारच ! अमेरिकेत 'लंच' ही अगदी फारच बोकाळलेली गोष्ट ! दुपारी बारा ते साडेबारा–अर्धा तास कामावरून बाहेर पडायचेच. एखाद्या मॅकडॉनल्डमध्ये शिरून चार–दोन सिगरेटी फुंकून फार तर एखादा कॉफी–कप रिकामा केला नाही तर तो दिवस अगदी खराब !

क्लीव्हलँडच्या भोवतीच्या 275 N संपवून 90 E ला लागलो तसं हुश्श वाटलं. आता ओहायो संपत आलं होतं. बॉर्डरवर Wel Come to Pensyluania ची पाटी पाहिलो नि एका प्रांतातून दुसऱ्या प्रांतात शिरल्याचा फरक चक्क जाणवू लागला. ओहायापेक्षाही 'पा'मधला रस्ता इतका पॉश होता का विचारू नका ! पण तो थोडाच वेळ. लगेच 'पा' ची बॉर्डर आली नि न्यूयॉर्क स्टेट सुरू झाले.

म्हणजे टोल (Toll) भरणे आलेच. न्यूयॉर्क तसे सदा कडक्यातच. रस्तादुरुस्तीसाठी जागोजाग क्वार्टर, डाइम गोळा करतात खरे; पण रस्ते तर अगदी नामांकित ठेवतात! पण नायगाऱ्यात शिरेपर्यंत ह्या प्रांतातून जाणंच भाग होतं. टोल भरत भरत बफलो शहराच्या हद्दीवर आलो नि नायगाऱ्याचं कल्पनेतलं चित्र प्रत्यक्ष पाहाण्यासाठी जीव अगदी आतुर झाला.

पण आत्ताच अगदी नौरोजींना फोटो बिटो काढायचा उत्साह आला होता. तो स्पॉट होता पण अगदी मस्त! हृषिकेशच्या लक्ष्मण-झूल्याची काहीशी आठवण करून देणारा. फक्त झूल्याखालून धोधो वाहाणाऱ्या गंगामाईऐवजी कार्सने तुडुंब असा धो धो वाहाणारा निळाशार रस्ता होता नि ऋषींच्या मठीऐवजी छोटेसे टुमदार रेस्टॉरंट! तरीपण मला अगदी नायगाऱ्यात पोचायची घाई झाली होती.

बफेलो शहरातून जाताना मात्र अमेरिकेविषयीच्या कल्पनेला चांगलाच तडा गेला. इथे सुद्धा एवढी गलिच्छ शहरे असतात असं सांगूनही खरं वाटणार नाही! नावाप्रमाणे 'बफेलो' खरे! खाचखळगे असलेले दिव्य रस्ते, काळचा काळचा धुरकट, मळकट, पडक्या इमारती नि केमिकल फॅक्टरीमुळे वातावरणात असह्य दुर्गंधी! क्षणभर अगदी ठाणा–डोंबिवलीमध्ये शिरल्यासारखे वाटले!

काय योगायोग असतो पहा! नायगाऱ्यासारखे सुंदर, निसर्गनिर्मित आश्चर्य नि बफेलोसारखा Ugly मानवनिर्मित नमुना एकमेकाला मिठी मारून बसलेत. म्हणजे नायगाऱ्याने फार शेफारून जायला नको नि बफेलोने फार वाईट वाटून घ्यायला नको!

अमेरिकेत सर्वांत जास्त बर्फ पडतो तो ह्याच ठिकाणी. तेव्हा ह्या Snow City मधूनच नायगारानदी ओलांडून कॅनडात प्रवेश करायचा होता. स्टेट्स व कॅनडाच्या हद्दीवरचे चेकिंग पोस्ट आले तसं मन कुठे तरी हुळहुळलं. एका देशातून दुसऱ्या देशात एवढ्या सहजतेनं जाता येतं, हे तोपर्यंत खरंही वाटत नव्हतं. भारतातून इकडे येतानाच्या वेळच्या पासपोर्ट, व्हिसा, मेडिकल, इंटरव्ह्यू, कस्टम चेकिंग वगैरे वगैरे वैतागाच्या गोष्टी आठवून आमचे चेकिंग तर बाजूलाच पण ग्रीन कार्डसूही विशेष उत्सुकतेनं न पाहाणाऱ्या अधिकाऱ्याविषयी आश्चर्य वाटले. बाकी आमचे अवतार पाहून ह्या गरीब बिचाऱ्या संसारी आशियाई लोकांचे कसले चेकिंग करायचे असंच वाटलं असावं त्यांना!

नायगारानदीच्या काठावरून जाणारा रिव्हररोड आहे मात्र अगदी शोभिवंत! दोन्ही बाजूस सुरेख भरगच्च वृक्ष, नदीचं काचेसारखं सुरेख निळं निळं पाणी! लोक बोटिंग, फिशिंग करण्यात, कोणी लँडस्केप स्केचिंग करण्यात गुंग! उगीचच टागोरांच्या कवितेची आठवण करून देणारं वातावरण!

दूरवर निरभ्र आकाशात एकच एकच पांढराशुभ्र ढग दिसायला लागला. जसजशी फॉलची साइट जवळ येऊ लागली तशी कार्स व माणसांची गर्दी वाढू लागली. आणि हे काय? निरभ्र आकाशातून एकदम पाऊस कसा? पाऊस कुठला–नायगाऱ्याच्या पाण्याचे शितोडे! एवढ्या दूरवर! अर्धा एक मैल लांबवर? जणू भेटीला येणाऱ्या पाहुण्यांचे स्वागतच!

धवधवा जसजसा दृष्टिक्षेपात येऊ लागला तसं तसं त्याच्या दर्शनाने मन अगदी भरून आले. वाटलं जगण्यातली खरी गंमत, सार्थक असं काही तरी पाहाण्यात, अनुभवण्यात आहे. सकाळपासून आठ–नऊ तासांच्या प्रवासानं आंबलेलं, शिणलेलं मन नि शरीर एकदम प्रफुल्लित झालं. थकवा कुठच्या कुठं पळाला. क्षणभर सगळ्या मनाचे, शरीराचे लाख लाख डोळे करून ते सौंदर्य साठवण्याची धडपड केली; पण भुकेल्यासमोर एकदम पंचपक्वान्नांचे ताट ठेवावे नि त्याच्याच्याने काहीच खाल्ले जाऊ नये, तसंच काहीसं झालं.

'अग आई केवलं पानी!' ह्या छोकरीच्या उच्चाराने मी तंद्रीतून जागी झाले. एवढा वेळ काळ, वेळ, स्थळांचे भानच विसरले होते. कुठले मॉटेल शोधावे ह्या चिंतेत नौरोजी होते. अमेरिकेत आल्यापासून मात्र माणसांची एवढी गर्दी पाहिली नव्हती. माणसे व गाड्या यांच्या गर्दीतून वाट काढत काढत मॉटेलचा रस्ता सुधारत होतो. गर्दीमध्ये बरेच भारतीय विशेषतः साडीधारी स्त्रिया व फेटेधारी सरदारजी पाहून मुंबईच्या चौपाटीवर तर नाही ना आपण, असं वाटलं. सर्व जगभर–लंडन विमानतळावर हातगाड्याही ढकलणारे जिथे सरदारजी दिसले होते–तिथे हा नायगाराच कसा अपवाद राहील?

आता अगदी सीझन असल्याने मॉटेल्स्चे एका रात्रीचे दरही जाम चढले होते. शेवटी एक बऱ्यापैकी पसंत करून, आंबलेल्या शरीराला थोडे ढिले केले. मस्त वॉश घेतला आणि आता पोटात कावळेही ओरडत होते. बाहेर जाऊन काही तरी हाणावे नि मस्त रपेट करत हळूहळू फॉलची मजा चाखावी असा बेत केला.

कारण अमेरिकेत आल्यापासून 'चालणे' ही गोष्टच जवळजवळ विसरून गेली होती. तेव्हा खूप चालून ती हौसपण भागवायची होती. पण त्यासाठी आधी पोटात गॅस भरणं आवश्यक होतं; रेस्टॉरंटमध्ये शिरलो खरे; पण मेनूकार्ड पाहून घोर निराशा झाली. चौपाटीच्या आठवणीने उगीचच भेळपुरी, वड्याचे खमंग वास नाकाभोवती रेंगाळत होते. इथे तसा एखादा उडप्याचा किंवा भैय्याचा छोटा स्टँड का नाही असं वाटलं. खरं म्हणजे सीझनमध्ये थोडे दिवस छान चालेल तो, एवढे भारतीय येतात इथे! असं म्हणेल प्रत्येक जण, पण काढणार नि चालवणार कोण हाच प्रश्न!

चमचमीत खमंग भेळ, भजीच्या विरहाने पुढ्यातला पिझ्झा नि हॅंमबर्गर्स अगदीच बेचव नि गचाळ वाटत होते; पण भूकच एवढी होती की कधीही नॉनव्हेज न खाणाऱ्या मी व माझी छोकरी पिझ्झावर तुटून पडलो होतो. मधून मधून चवीला फ्रेंच फ्राईज् व पेप्सी होतीच; पण आता दोन दिवस जरा खाण्यापिण्याचे असेच हाल आहेत हे डोळ्यांसमोर दिसत होते.

या नायगाऱ्याने एक प्रकारची झिंग आणली होती. मोकळेपणाने आरामसे फिरताना कसं बरं वाटत होतं. एरवी रस्त्यावरून चालले की कार–स्वार आश्चर्याने, प्रश्नार्थक मुद्रेनं क्वचित् चिडूनही पाहात असतात. नि पेडस्ट्रियन्स्ना मोटारींपुढे दबून राहावे लागते; पण इथे सर्व प्रवाशांनी रहदारीचे सगळे नियम धाब्यावर बसवलेले. सर्व जगातून पब्लिक येणार, कुणाला नि किती शिस्त नि नियम शिकवणार? शिवाय एवढ्या सीझनमध्येच फक्त नायगारा फॉल गावातला धंदा चालणार; एरवी तिथे माशीही फिरकणार नाही! हे गाव आहे मात्र अगदी छान, छोटे नि टुमदार! मॉटेल्स, हॉटेल्स, रेस्टॉ-

रंट्स, डिस्को क्लब्स वगैरे वगैरे प्रवाशांसाठी लागणाऱ्या सर्व मोसमच्या गोष्टी खच्चून भरलेल्या ! पण सर्व दुप्पट–तिप्पट किंमतीत ! एक रेस्टॉरंट तर उंच आवारातच बांधलंय्. नायगाऱ्याची ऐतिहासिक माहिती देणारं भव्य म्युझियमही बांधलंय !

किती प्रकारांनी तुम्ही नायगारा पाहाल हे तुमच्या उत्साहावर अवलंबून आहे. अगणित प्रकार इथे उपलब्ध आहेत. नुसते चालत जाऊन पाहा, क्वार्टर टाकून पाच मिनिटे टेलिस्कोपमधून पाहा, घोडागाडीतून पाहा, नायगाऱ्याच्या तळाशी बोटीतून जा. आकाशात विहरत हेलिकॉप्टरमधून पाहा ! प्रत्येक स्थितीतून वेगवेगळं सौंदर्य अनुभवा !

पण तुम्ही कसेही, कुठुनही पाहिलेत तरी नायगाऱ्याची स्थिती मात्र आहे तशीच राहणार आहे. हा मुख्यत्वेकरून दोन भागात विभागला गेला आहे. तशी त्याला दोन नावे आहेत. Horse Shoe Fall हा पूर्वपश्चिम आहे. म्हटला तर कॅनडात, म्हटला तर स्टेट्समध्ये ! त्याचा आकार अर्थातच घोड्याच्या नालाप्रमाणे. ह्या धबधब्यावरचा भाग सदोदित पांढऱ्या शुभ्र ढगाने व्यापलेला असतो. व त्याच्या परिसरात दर दहा–पंधरा मिनिटांनी एकदोन मिनिटे धोधो पाऊस कोसळतो. एरवी पण एवढे तुषार उडत असतात की माणसे रेनकोट घालूनच फिरत असतात.

ह्या मधून मधून पडणाऱ्या पावसाचे कारण परमेश्वर ( की फिजिसिस्ट ? ) जाणे; पण इतर सर्वत्र आकाश निळेशार निरभ्र असताना असा पाऊस पडतो व लोकं छत्र्या, रेनकोटांत फिरतात ही गोष्ट मात्र खरी !

धबधब्याचा दुसरा भाग ज्याला American Fall म्हणतात हा दक्षिणोत्तर असून तो पूर्णपणे अमेरिकेत आहे. कॅनडाच्या हद्दीतून याचे सौंदर्य विशेष अनुभवता येत नाही. हॉर्स शू फॉलच्या मात्र काठावर उभं राहिलं की वाहाणाऱ्या पाण्याच्या वेगाने क्षणभर आपण जमिनीवर नसून बोटीतच आहो की काय असं वाटतं. या धबधब्यात एवढं पाणी येतं कुठून नि जातं कुठे हे पण एक कोडंच वाटतं. एवढ्या पाण्यावर कॅनडात एक वीजकेन्द्र चालवलंय ह्यात आश्चर्य कसलं ?

## दोन दिवस धुंदीच

आम्ही नायगाऱ्याचा मुहूर्त मात्र असा शोधला होता की त्या चार दिवसांत तिथले कडे सारखे कोसळत होते. बराच Hivac होणार वगैरे वावड्या, भविष्य वर्तवले जात होते; पण थोडक्यात निभावले. मनात धाकधुक होती; पण खास काही घडलं नाही !

नायगाऱ्याच्या पार्श्वभूमीवर फोटो वगैरे काढण्याचे नि त्याच्या काठावर असलेल्या पार्कमधून पिकनिक करण्याचे वगैरे सर्व कार्यक्रम यथासांग पार पाडले. कॅमेरा 'आटमॅटिक' नसेल तर ग्रुप फोटोत फोटो काढणारा येणं मुष्किलच असतं.अशा वेळी दुसरा परका कोणी भेटला की बरं वाटतं. हॉलंडहून आलेलं एक टोळकं–बिचाऱ्यांना इंग्लिश चांगलं येत नव्हतं; पण त्यांचा फोटो काढल्यावर लगेच आमचाही काढून मिळाला. तेवढ्यांत हॉलंडकराशी जाताजाता 'जर्मन' मध्ये बोलून आम्ही भाव मारून घेतला !

अमेरिकेत गोऱ्या कातड्यामुळे युरोपियन, कॅनेडियन, ऑस्ट्रेलियन सर्व सारखेच दिसतात. आपण आशियाई मात्र ताबडतोब वेगळे दिसतो ! बावळट असले तरी ते लोक खपून जातात, आपण मात्र कितीही स्मार्ट असलो तरी त्या गोऱ्या समुदायात 'मामा' च दिसतो !

इथे मात्र अगदी मोकळेपणाने हिंडायला मिळत होते. 'अहा ! काय सुंदर फुलं आहेत !' असं म्हणत आम्ही एका Mapple Hill नांवाच्या शॉपिंग सेंटरमध्ये शिरत होतो, तेव्हा रात्रीचे बारा वाजले होते. हे सांगून खरं वाटत नव्हतं. गणेशोत्सवात 'सर, बारापर्यंत नक्की येतो' जसं रेक्टरना सांगून पहाटे दोन-तीनपर्यंत आम्ही पोरी उंडारत असू, पण अमेरिकेत एवढ्या अपरात्री फिरण्याची पहिलीच वेळ होती.

प्रवेशद्वारातल्या रंगी-बेरंगी कारंज्यांने उगीचच वातावरण हलकं, रंगीत बनवलं होतं नि प्रवेशद्वारातच बसून फिडलवर Country Music तोडणाऱ्या त्या चटपटीत गृहस्थाने ते आणखीनच धुंद, कलात्मक बनवलं होतंन्.

Window Shopping करत असतानाच सदान्कदा भविष्याच्याच विचारात गुंग असणाऱ्या नौरोजींचं लक्ष तुमची जन्मतारीख व हस्ताक्षरावरून भविष्य सांगणाऱ्या कॉम्प्युटरकडे गेलं. त्याने सांगितलेल्या भविष्यावर कडूगोड तोंड करतच छोकरीचा आइसक्रीम–हट्ट पुरवण्यासाठी रेस्टॉरंटमध्ये शिरलो. सदान्कदा अन्नातील कॅलरीजचे मोजमाप करीत लंच, डिनर घेणारे आम्ही नायगाऱ्याच्या धुंदीत आइसक्रीम चक्क हाणत होतो.

दोन दिवस नायगारा पाहाण्याची, चालण्याची हौस चांगलीच फिटली होती. कारण भातपोळीविना उपाशी असलेलं पोट आता घराची आठवण करून देत होतं. देवानं पोट दिलंय म्हणून केवळ कर्तव्याची आठवण राहाते नाही का ? सौंदर्याने नुसतं मन नि हृदय भरतं, तसं पोटही भरत असतं तर माणूस नुसता कल्पनेचे पंख लावून सारख्या भराऱ्या मारत राहिला असता !

सकाळच्या वेळी परत एकदा कॅनडाहून नायगाऱ्याचे शेवटचे दर्शन घेतले नि जड अंतःकरणाने कॅनडाची हद्द सोडली. नदीवर पूल बरेच आहेत; पण त्यांपैकी एकावरून माणसे चक्क चालत ह्या देशातून दुसऱ्या देशात जातात. कॅनडातून नायगाराफॉल गावातून रोज नोकरीसाठी अमेरिकेत बफेलो शहरात येणारे लोक आहेत म्हणे. तशी नोकरीसाठी रोज साठ–सत्तर मैल कारने जा-ये करणारी माणसे असतात इथे; पण एकदा नौरोजी म्हणाले की 'आमच्या कंपनीत एकजण रोज लंडनहून येतो,' हे ऐकून तर मी चाट ! पण हे 'लंडन' म्हणजे इंग्लंडचे नव्हे हो तर ओहायोतलेच एक खेडे हे कळल्यावर म्हटलं हात्तेरी !

अमेरिकेच्या हद्दीत परत प्रवेश होईपर्यंत मात्र माझ्या जिवात जीव नव्हता; पण आमच्या 'एरियन रजिस्ट्रेशन कार्डस'चीही चौकशी न होता आम्ही बाफेलोत प्रवेश करते झालो. इथे कॅनडा-एवढी नाही पण बऱ्यापैकी व्यवस्था आहे प्रवाशांसाठी ! माझ्या टिपिकल बायकी उत्साहाची शॉर्टवेव्ह संपत आली होती नि नौरोजींच्या उत्साहाची मात्र हाइट होती. कॅनडात एवढा मनसोक्त फॉल पाहिलाय् आता इथून आणखी काय वेगळा दिसणारे असं वाटत होतं. शिवाय 'अमेरिकन फॉल' मला कॅनडातून अजिबातच

इंटरेस्टिंग वाटका नव्हता; पण एलेव्हेटरमधून फॉलच्या अगदी तळाशी जाऊन–त्याच्या पोटातच शिरून म्हणा ना, निसर्गाचे ते आश्चर्य अगदी जवळून अनुभवलं नसतं तर केवढी मोठी चूक केली असती असं वाटलं !

धबधब्याच्या तळाच्या विशाल पत्थरावर बसून पाण्यांचे इंद्रधनुषी तुषार अंगावर उडवून घेताना क्षणभर उगीचच आपण हिरॉइन असल्यासारखं वाटलं व वरून धोधो पडणाऱ्या धबधब्याचं सौंदर्य पाहून–सौंदर्यसुद्धा कसं भयंकर असू शकतं, ते पटलं. श्रीकृष्णाचं खरं स्वरूप पाहून अर्जुनाला जसं वाटलं असावं तसंच काहीसं वाटलं. भीतीनं क्षणभर डोळेच मिटून घेतले.

दोन्ही धबधब्यांची मनाशी उगीचच तुलना करीत आम्ही घरचा रस्ता सुधारत होतो. Sunny day चे कडाक्याचे ऊन्ह आता चांगलेच जाणवत होते आणि म्हणूनच दर तासा–दीड तासाने मधून मधून दिसणाऱ्या सुंदर Rest Area चा फायदा घेऊन पुन्हा ताजेतवाने व्हायचा प्रयत्न करत होतो.

रस्त्याच्या दोन्ही बाजुंची सुंदर हिरवीगार वनश्री कडाक्याच्या उन्हात डोळ्याला चांगलाच गारवा देत होती. आपल्या संस्कृत सुभाषितात हृचा परोपकारी, निःस्वार्थी, निरपेक्ष निसर्गाचे किती सार्थ वर्णन केलंय नाही ? इथे एका वनश्रीचा निसर्गाचा डौल मात्र उन्हाळ्यातच ! विशेषतः बर्फ पडणाऱ्या प्रदेशात हे वृक्ष हिवाळ्यात बर्फ पडत असताना ऋषिमुनींप्रमाणे उघड्या अंगाने तटस्थपणे कडक तपस्याच करत असल्यासारखे दिसतात. अमेरिकेत पहिला हिवाळा अनुभवत असताना मला वाटलं होतं की, ही झाडंझुडुपं आता मेलीच; पण पुढे वसंतऋतूच्या–स्प्रिंग सीझनच्या–आगमनानं पुन्हा पालवी फुटू लागली तशी हायसं वाटलं होतं.

इथल्या वृक्षराजींची खरी शोभा पाहावी ती इथला फॉल किंवा Autumn हा सीझन सुरू झाल्यावर ! हिरव्या, पोपटी, पिवळ्या, केशरी, लाल रंगाच्या निसर्गातील एवढ्या अनंत शेड्स् इथे आल्यावरच पाहिल्या. निसर्ग नुसता धुंद होऊन दोन–एक महिने मनसोक्त रंगपंचमीच खेळत असतो जणू !

परदेशी रंग म्हटले की, मला गोळवलकरगुरुजींची आठवण येते. लहानपणी एकदा आमच्या घरी गुरुजी आले असताना मोठ्या कौतुकाने बहिणीने त्यांना परदेशी सुंदर फुलांचा गुच्छ दिला होता. त्यावर 'ही परदेशी फुले–नुसती रंगीत-वासाचा पत्ता नाही–काय उपयोग ?' असे उद्गार काढणाऱ्या गुरुजींवर आम्ही मुली रागावलो होतो; पण डेलियाचे मोडक्यातोडक्या मराठीत कौतुक करणाऱ्या अटलजींविषयी मनात मैत्रीची भावना वाटली होती. वास नाही म्हणजे त्या फुलात काहीच नाही हे मात्र अजूनही पटत नाही.

एकूणच इथल्या निसर्गाविषयी मनात नेहमी आश्चर्य वाटत असते. चार महिने उन्हाळा, चार महिने पावसाळा नि चार महिने हिवाळा अशा ठराविक विषुवृत्तीय संथ थंड हवामानाची सवय असलेल्या भारतीयांना प्रथम प्रथम इथल्या उत्तर–ध्रुवीय हवामानाचे कोडेच उलगडत नाही; पण जसजसं पृथ्वीच्या उत्तर–दक्षिण टोकांजवळ जावं तसंतसे सर्व ऋतु, हवामान ही टोकाला पोचल्यासारखी वाटतात. थंडीतील थंडी सहन होत नाही नि तेवढाच उन्हाळाही. थंडीतला ८ तासांचा दिवस नि उन्हाळ्यातली ८ च तासांची रात्र ! आणि हे बदल असे झपाटचाने होत असतात. निसर्गाच्या ह्या आवर्तनांचा परिणाम त्या त्या ठिकाणच्या मनुष्यस्वभावावर, जीवनावर होत असावा, नाही का ?

आपल्या तिकडचा निसर्ग जसा संथ, थंड तसा मनुष्यस्वभावही संथ, थंड ! इथे लोकांना सगळीच घाई ! रोजचे आयुष्य तर अतिवेगवानच ! पण लहान मुलांना लौकर तरुण व्हायची घाई नि तरुणांना लौकर आईबाप व्हायची घाई ! फक्त मरणाची इथे आणि कुठेच कुणाला घाई नसते !

फॉल सीझनमध्ये निसर्ग जेव्हा असे सुंदर रंग बदलत असतो तेव्हा लोक मुद्दामहून नायगाऱ्याला का जातात हे मात्र नायगारा पाहिल्यावरच कळलं. अप्रतिम असा तो धबधबा नि त्या भोवती निसर्गाने केलेली रंगांची उधळण ! ते दृश्य कसे दिसत असेल व पुन्हा ते पाहावयला कधी मिळेल ह्या विचारात गुंतले.

संध्याकाळचा सूर्यप्रकाश वातावरण रंगीत बनवत होता नि त्यात विजयी नौरोजींचा चेहरा चमकत होता. रात्री दहाच्या आत घरी पोचावे म्हणून मोठ्या शर्थीने गाडी पळवली होती. पोटात कावळे चांगलेच ओरडत होते नि म्हणूनच रात्री दहा वाजता उत्साहाने वनविलेला पिठलं–भात श्रीखंडपुरीहून चविष्ट लागत होतं.

उद्यापासून पुन्हा नेहमीचं चक्र सुरू होणार होतं ! पण आता मधून मधून चवीला नायगाऱ्याच्या सुखद आठवणी होत्या; □


मोठमोठ्यांना जे साधत नाही व साधलेले नाही ते येथे एका शाळाकॉलेजात न गेलेल्या स्त्रीने सहजगत्या साधले आहे... –प्रा. वा. ल. कुलकर्णी

(प्रास्ताविकातून)

# सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची, सर्वसामान्य वाचकांची दाद लाभलेले हंसा वाडकर यांचे अनोखे आत्मचरित्र.

तिसरी आवृत्ती । किंमत : बारा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

पुस्तके

# सहज फुललेल्या कथांचा संग्रह

## छुक छुक छैय्या

आपल्या दैनंदिन जीवनात अनेक साधेसुधे, विशेष न वाटणारे प्रसंग घडत असतात. सर्वसाधारण वाटणाऱ्या आशाआकांक्षांची प्रतिबिंबं त्यातून उमटत असतात. फारसं काही वेगळेपण नसलेले भावतरंग बहुतेकांच्या मनात सारखेच असतात. (उदा. देखण्या स्त्रीवर आपली छाप पडून तिनं आपली आवर्जून दखल घ्यावी, असं वाटणं.) प्रामुख्यानं अशा साध्या-सुध्या भावतरंगांना, आशा-आकांक्षा प्रतिबिंबित करणाऱ्या प्रसंगांना सहज शैलीत दिलेलं कथारूप डॉ. वसंत पटवर्धन यांच्या 'छुक छुक छैय्या' या संग्रहात पाहायला मिळतं.

एकूण सोळा कथांचा हा संग्रह आहे. त्यातल्या 'चॉकोलेट', 'दावा', 'सोबत' अशा दोन-तीन कथा वगळता बाकीच्या सर्व अशाच सहजतेतून उभ्या राहिलेल्या आहेत. आपल्या जीवनात काही तरी अघटित घडावं, असा ध्यास असणाऱ्या अनंताला विमानात असताना अपघात व्हावा, असं वाटावं आणि प्रत्यक्षात तो होऊन त्याच्यासह सर्वांचा त्यात अंत व्हावा (अघटित), पहिलं चुंबन घेण्यात अधीरता आणि एक अवर्णनीय आनंद वाटावा; पण पुढच्या वेळी मात्र हा पहिलेपणाचा आनंद पुन्हा न लाभण्याची रुखरुख लागावी (चुटपुट), अतिउच्च वर्गात प्रत्येकानं स्वतःपुरतच पाहण्यामुळं कुणाचंच कुणाशी माणुसकाचं नातं न जमता सर्वांनी आपल्याच तोऱ्यात राहावं (कोजागरी), बायकोच्या मैत्रिणीवर प्रेम असावं, ते बायकोला माहीत आणि काही प्रमाणात मंजूरही असावं आणि अशा भाववेड्या मैत्रिणीचं लग्न ठरल्यावर रुखरुखही लागावी आणि एक आनंदही व्हावा (वैजयंती), एकमेकांना आवडणाऱ्या दिनेश आणि जाई यांनी कथा सांगून परस्परांवरचं प्रेम व्यक्त करावं आणि शेवटी कथेतल्या पात्रांऐवजी आपली नावं घालून प्रेम बोलून दाखवावं (सिंड्रेला), देखणी स्त्री दिसल्यावर तिच्यावर छाप पाडण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या पण एका मर्यादेपर्यंतच हा प्रभाव वापरण्याचं धाडस असणाऱ्या आनंदा ओकचं हे सारंच तंत्र एका देखण्या बाईच्या बाबतीत त्याच्यावर उलटावं (बूमरँग), वयात आल्यामुळं कुठल्याही मुलीबद्दल जवळीक वाटणाऱ्या विनायकचं प्रत्यक्षात कुणाशीच प्रेम जमू नये, त्याच्या मनात या आकर्षणाची-ओढीची-प्रेमाच्या इच्छेची संमिश्र भावना हेलकावत राहून त्यातच तो बुडून जावा (छुक छुक छैय्या) या अशा सहजतेतून उभ्या राहिलेल्या कथा आहेत. रचना आणि भाषा या दोन्ही दृष्टींनी वाचकाला त्या सुखावणाऱ्या आहेत. त्यातला नवेपणा त्यांच्या आशयात नाही तर काही प्रमाणात व. पु. काळेयांच्या ढंगाच्या अशा कथा-रचनेत, शलीत आहे. म्हणूनच कथा काय आहे, हे प्रारंभीच लक्षात आलं तरी ती शेवटपर्यंत वाचण्याची उत्सुकता कायम राहते. याच पठडीतल्या 'हम भी आदमी थे', 'माझं संशोधन', 'सत्य वदे वचनाला' या कथा मात्र तितक्या चांगल्या वाटत नाहीत.

'स्त्रीधन', 'चॉकोलेट', 'दावा' आणि 'सोबत' या चार कथा बाकीच्या कथांपेक्षा अत्यंत भिन्न प्रकृतीच्या आहेत. त्यांचा मुखवटा जास्त गंभीर, करुण असा आहे. अकाली पती वारलेल्या, सेल्सरिप्रेझेंटेटिव्हचं काम करणाऱ्या एका सुडौल बांध्याच्या तरुणी-विषयी असणारी 'ती मुक्त संबंध ठेवणारी असावी' वगैरे कल्पना आणि प्रत्यक्षात जी दुःखी जीवन कंठत असताना स्वतःच्या दागिन्यांचा त्याग करायला तयारी दर्शविणारी ती असावी (स्त्रीधन), युद्धात जखमी झालेला आपला पती जिम घरी येण्याच्या क्षणानं आनंदलेल्या एथेल्लानं त्याला नि मुलगी जेनाला आवडणारं, न परवडणारं महागडं चॉकोलेट घेऊन यावं आणि त्यावरूनच तो चिडावा; पण थोड्या वेळात चूक उमगून त्यानं तिचा रुसवा काढून गोड शेवट व्हावा (चॉकोलेट), घराण्यात शंकरशेट शिष्यवृत्ती आणण्याच्या ध्यासानं आधी मुलावर आणि नंतर नातवावर परिश्रम घेणाऱ्या आजोबांची तळमळ आणि नातवाची इंजिनिअर व्हायची इच्छा यातून आलेल्या अपयशानं कधीच न उठणारे आजोबा (दावा), लहानपणी अपंगत्व आल्यामुळे कुबड्यांच्या आधारानं जाणारा वासू तऱ्हेवाईक स्वभावाचा व्हावा, त्याचं कुणाशी पटू नये आणि अखेर नदीच्या पुरात तो मरण पावल्यावर तरी त्याला त्या कुबड्या लागायला नकोत म्हणून त्या नेऊ न देणारी आई (सोबत), बालमानसशास्त्राच्या कृत्रिम पद्धतीमुळे मुलांवर होणाऱ्या परिणामाचा दाहक अनुभव घेणारे उपासनीमास्तर (रजाचा गज) अशा या कथा आहेत. यातली 'स्त्रीधन' ही कथा कृत्रिम वाटते; पण स्वतःच्या आकांक्षा दुसऱ्यावर लादायचा प्रयत्न केल्यामुळं येणारं अपयश आणि मानसिक कोंडी यांचं चांगलं चित्रण 'दावा' या कथेत दिसतं. तसंच नव्याच्या कृत्रिम हव्यासापायी होणाऱ्या एका (शिक्षण) क्षेत्रातल्या दुष्परिणामाचा प्रत्यय 'रजाचा गज' या कथेत येतो. 'सोबत' या कथेत फारसं नाविन्य नाही. 'चॉकोलेट' ही कथा मात्र सुंदर झाली आहे.

अशा दोन प्रकारच्या या कथा आहेत. 'चॉकोलेट'सारखी एखादी गंभीर स्वरूपाची चांगली कथा असली तरी पटवर्धनांची लेखणी हसऱ्या-खेळकर-बोचऱ्या शैलीतच जास्त रमते. त्यात ती अधिक प्रभाव पाडते. त्यातच त्यांच्यातला समाजचिंतक मार्मिक टिप्पणी करून जातो. म्हणूनच उच्चभ्रू समाजाचं बेगडीपण उघडं करणारी 'कोजागरी'-सारखी साधीसुधी कथाही आपल्याला भिडते किंवा 'अर्थमंत्र्यांनी श्रीमंतांवरच कर बसवून सामान्य माणसाला सूट दिली तर जितकं आश्चर्य वाटेल...' किंवा 'मराठी वाङ्मया-

तल्या केशवसुतांपासून तो केशवकुमारापर्यंत सगळ्या लेखकांच्या वाङ्मयावर संशोधन करून बहुतेकांनी पीएच. डी. पदवी घेतल्यानं, मुंबई–पुणे विद्यापीठांनासुद्धा आता आपल्या कारखान्यात काही नवीन माल पैदा व्हावा असं वाटू लागलं असावं, असं मला वाटायला लागलं होतं,' अशी बोचरी टिप्पणी ते करतात.

पटवर्धनांची लेखणी एका रसिकाची लेखणी आहे, याचे अनेक दाखले या कथा देतात. संस्कृत काव्याचं त्यांना प्रेम आहे. त्याच्या संस्कारातूनच त्यांची लेखणी काव्यात्म शब्दरचनेबरोबरच 'आपल्या नाजूक हातानं पोलक्यातल्या स्वप्नांशी खेळणारं पेन तिनं काढलं होतं नि काउंटरवर अर्धवट कमान टाकून आपल्या मैत्रिणीला तार करण्यात ती गुंग होऊन गेली होती. तिच्या प्रत्येक कृतीनं विनायकला मंत्रमुग्ध केलं होतं. त्या पेनचा त्याला हेवा वाटला होता. कठडा असल्यानं इंद्रधनुष्याची फुललेली स्वप्नं त्याला अस्फुट पहायला मिळाली. पानाआड दडलेल्या मोगऱ्याच्या कलिका तो प्रथमच इतक्या जवळून बघत होता !' असं शृंगारिक चित्र उभं करते. काही ठिकाणी मात्र जुन्या घाटणीचा आणि 'पन्नास टक्के प्रेम' सारख्या गुळगुळीत झालेल्या उपमांचा त्यांनी वापर केला आहे; पण त्याचं प्रमाण कमी आहे.

अशा या एकूण सोळा कथांचा हा संग्रह आहे. तो विविधतापूर्ण आणि वाचनीय असला तरी एकात्म परिणामाच्या दृष्टीनं त्याचं संकलन–संपादन अधिक वेगळ्या पद्धतीनं व्हायला हवं होतं. यातल्या हसऱ्या खेळकर किंवा काव्यात्म शैलीतल्या कथा या एका स्वरूपाचा परिणाम साधणाऱ्या आहेत, तर 'दावा', 'चॉकलेट' वगैरे करुणात्म कथा वेगळा परिणाम साधणाऱ्या आहेत. या कथा (संग्रहाचं नावही सहज–कथातल्याच एका कथेचं आहे) संग्रहातून वगळल्या असत्या तर वाचनीयतेबरोबरच त्याची एकात्म अशी परिणामकारकताही वाढली असती.

–विजय कुवळेकर

**छुक छुक छैया**
लेखक : डॉ. वसंत पटवर्धन
प्रकाशिका : सौ. शकुंतला लाटकर
कल्पना मुद्रणालय, पुणे ३०
पृष्ठे १८५, किंमत १५ रुपये

फिनिक्स निवड

# Persons, Passions & Politics

Mohammad Yunus
(Vikas Publishing House Pvt. Ltd. Pages 333, Rs. 50/— )

गरुडनाकी (aqiline–nosed) श्री. महमद युनुस यांनी डबल गरुडनाकी बादशाह खान यांचे चिटणीस म्हणून आपल्या राजकीय कारकीर्दीस सुरुवात केली. श्री. मथाईंपेक्षा नेहरूकुटुंबियांना ते अधिक जवळचे वाटत असत. आणीबाणीत ते इंदिरा गांधींचा उजवा हात होते हेही सर्वांना माहीत आहेच. इंडोनेशिया, टर्की, इराक, स्पेन व अल्जेरियामध्ये त्यांनी बरीच कामगिरी केली आहे. भारतातील सर्वांत मोठा औद्योगिक मेळावा–आशिया ७२–त्यांच्या हाताखालीच भरला होता. विकसित देशांनी या मेळाव्यानंतर व्यापार करायचा एक नवीन पायंडा पाडला होता.

मथाईंच्या नेहरूंच्या पुस्तकात स्टंटबाजी आहे तर युनुस यांच्यावरील पुस्तकात एक प्रकारची restrained, refined dignity आहे. मथाईंचे वर्णन युनुसनी असे केले आहे, 'सर्व्हंन्टस् क्वार्टर्सच्या पार्श्वभूमीवर तो उठून दिसत असे !' हे अगदी तंतोतंत खरे वाटते. कारण जशा मथाईंनी नेहरूकुटुंबियांच्या गोष्टी चव्हाटचावर आणल्या तशा गोष्टी खालच्या थराचे नोकरच करू शकतात !

श्री. युनुस हे अनेक आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या व्यक्तींशी मिसळले आहेत. पुस्तकातला एक फोटो तर सोफिया लॉरेन व चार्लस् हेस्टनबरोबर आहे. आम्ही इतरत्र सांगितलेच आहे की, युनुसची मते पटोत अगर न पटोत, पण पुस्तकाची शैली ही ओघवती व सहजसुंदर आहे.

एकदा खुशवंत सिंगांनी इंदिरा गांधींना एक महंमद युनुसचे टेप केलेले भाषण पाठवून दिले व तुमचा हा राजकीय वकील नेहमी शिवीगाळीची भाषा वापरतो, अशी चिठ्ठी सोबत धाडून दिली; परंतु युनुस असे सांगतात, 'ही टेप रीप्ले न करताच त्यांनी धाडली होती व त्यातून काहीही निष्पन्न झाले नाही !'

या घटना सदर पुस्तकात चार भागात विभागून दिल्या आहेत. पहिल्या भागात आपल्या राजकीय जीवनाच्या आरंभापासून ते स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंतच्या कालावधीचे चित्र युनुस यांनी उभे केले आहे. दुसऱ्या भागात त्यांनी विविध देशांत भारतीय वकिलातीचे मुख्य म्हणून केलेली कामगिरी आपल्या निदर्शनास येते तर तिसऱ्या भागात नवी दिल्ली येथे बजावलेल्या कामगिरीचा उल्लेख आहे. सर्वांत शेवटच्या भागात १९७७ च्या निवडणुकीनंतरच्या कालखंडाचे चित्रण आढळते.

ब्रिटिश सत्ताधाऱ्यांच्या कावेबाजपणाची झलक युनुस यांनी आपल्या पुस्तकात दिली आहे. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी फाळणीचा मसुदा सर्व राज्यविधिमंडळाकडे संमति मिळविण्याकरिता पाठवला; परंतु सरहद्द प्रांतात (सध्याच्या पाकिस्तानमधील NWFP) मात्र विधिमंडळातील कॉंग्रेस–वर्चस्वामुळे तिथे मुस्लिम लीगच्या आशाआकांक्षांना मूठमाती मिळण्याची शक्यताच जास्त होती. म्हणून सार्वमताची टूम काढण्यात आली. आता यातील मेख अशी होती की, साध्या निवडणुकीत गैरप्रकारांबद्दल उमेदवाराला शिक्षा होऊ शकते व त्याची निवडही (जर तो विजयी झाला असेल तर) रद्द होऊ शकते; पण सार्वमताच्या व्यवस्थेसंबंधी सर्वपक्षी बैठक बोलावली तेव्हा कॉंग्रेसचे प्रतिनिधित्व करणाऱ्या युनुस यांनी सरकारला न्याय्य निकाल अपेक्षित आहे काय, असे विचारले तेव्हा साहेबबहाद्दूर उत्तर देताना म्हणाले की, सरकार, पक्ष व पक्षनेते या दोहोंच्या प्रामाणिकपणावर अवलंबून राहील. त्यांनी आपल्या पाठीराख्यांना गैरकृत्ये करण्यापासून रोखले पाहिजे ! परंतु साहेबाला आपल्या हाताखाली काम करणाऱ्याची कर्तृत्वशक्ती माहीत नव्हती असे वाटते.

या गोष्टीमुळे आणि पठाण हिंसाचाराला प्रवृत्त होतील या भीतीमुळे सरहद्द गांधींनी सार्वमतावर बहिष्कार टाकला. या चुकीच्या दुर्दैवी निर्णयामुळे मुस्लिम लीगचे चांगलेच

फावले. गैरप्रकारांना सीमाच उरली नाही. एकूण मतदारांपैकी पन्नास टक्क्यांहून जास्त लोकांनी मतदानच केले नाही. त्यामुळे मुस्लिम लीगच्या बाजूने कौल लागून फाळणीच्या सूचनेला हिरवा कंदील मिळाला.

बडे गुलाम अली खाँ या प्रसिद्ध गायकाचा किस्साही वाचण्यासारखा आहे. फाळणीनंतर गुलाम अली खाँ पाकिस्तानला गेले; पण तीन वर्षांतच परत भारतात आले. जेव्हा त्यांना याबद्दल विचारले तेव्हा ते म्हणाले की, फाळणीमुळे झालेल्या दंग्यांनी घाबरून ते पाकिस्तानला गेले; पण तिथे त्यांना दुसरेच प्रश्न भेडसावू लागले. एकदा एका मैफलीत ठुमरी आळवताना ठुमरीतील 'शाम' हा शब्द ऐकल्यावर पाकिस्तानात कृष्णाचे नाव नको असा ओरडा झाला. यावर 'तो मैं किसका नाम लू ? मोहम्मद अली जिना या लियाकत अली या फिर सिकंदर मिर्झा को याद करूँ ?' अशी मल्लीनाथी बडे गुलाम अली खाँनी केली व ते भारतात परत आले!

सबंध पुस्तकातून प्रकर्षाने जाणवतो तो युनुस यांचा प्रखर राष्ट्रवाद! त्यांनी काहींच्याबद्दल जे काही लिहिले आहे ते आपणास पटेल की नाही हा मुद्दा वेगळा; पण त्यांच्या राष्ट्रीयतेच्या भावनेचा आविष्कारच सर्वत्र जाणवतो. यामुळेच कदाचित जेव्हा युनुस यांची एका देशात बदली झाली तेव्हा त्याच देशात योगायोगाने त्यांच्या मेहुण्याची पाकिस्तानी प्रतिनिधी म्हणून नियुक्ती होणार होती; पण युनुस यांच्या नेमणुकीचे वृत्त कळताच पाकिस्तानी सरकारने त्यांची (मेहुण्यांची) नेमणूक रद्द केली.

१९६५ च्या भारत–पाक–युद्धाचे वर्णन प्रेसिडेन्ट जॉन्सन यांनी मुस्लिम पाकिस्तान व हिंदु भारत यांच्यातील युद्ध असे केले होते. कॉन्स्युलेट जनरल या नात्याने बोलताना अनेक लंच् (luncheon) बैठकीत भाषणाच्या शेवटी भारत व प्रोटेस्टंट अमेरिका यांची मैत्री वृद्धिंगत होईल असे उद्‌गार ते काढायचे. एखादा तीक्ष्ण श्रोता 'प्रोटेस्टंट अमेरिका' या शब्द–प्रयोगाबद्दल स्पष्टीकरण मागायचा. तेव्हा भारतात लाखो मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, जैन, पार्शी लोक असताना जर भारताचे वर्णन हिंदू भारत असे केले जाते तर प्रोटेस्टंट कॅथॉलिक व ज्यू लोक अमेरिकेत असताना अमेरिकेला प्रोटेस्टंट अमेरिका म्हणून संबोधित केले तर त्यात काही गैर नाही. कारण मी तुमच्याच अध्यक्षांचे अनुकरण करतोय असा टोमणा युनुस मारायचे. शेवटी याची योग्य दखल घेतली जाते. स्व.जयप्रकाश नारायण यांचे अत्यंत काळे चित्र पुस्तकात रंगवले गेले आहे. 'स्वतःच्या फायद्यासाठी त्यांनी निरनिराळ्या मोहिमा काढल्या किंवा ज्या होत्या त्यांना पाठिंबा देऊन स्वतःचे नाव जनमानसी उतरवण्यासाठी खटपट केली. नेहरूंच्या मैत्रीचा फायदा त्यांनी घेतला व नेहरूंच्या मृत्यूनंतर त्यांची निंदानालस्ती केली. तसेच जयप्रकाशजी आपल्यावरची जबाबदारी टाळायचा प्रयत्न करायचे. त्यांना फक्त ऋषितुल्य नेता व राष्ट्रीय घडामोडींचा केंद्रबिंदू म्हणून बनणे आवडायचे. स्व. जयप्रकाशजी प्रसिद्धीसाठी हपापलेले असायचे!" यातील सर्व मुद्दे वादग्रस्त आहेत यात शंकाच नाही. उदाहरणार्थ नेहरूंच्या मैत्रीचा फायदा जयप्रकाशजींनी कसा घेतला व त्यांच्या विरुद्ध काय उद्‌गार काढले, आपले नाव प्रसिद्धिझोतात यावे यासाठी त्यांनी काय केले, जबाबदारी कधी टाळली, इत्यादी.

आणीबाणीतील नेत्यांचे व पत्रकारांचे वर्णन, जर युनुस यांनी त्यांच्याबाबत जे काही लिहिले असेल ते आधारभूत मानले तर, एकाच वेळी किळस, घृणा व क्रोध अशा विविध भावना वाचकांच्या मनात निर्माण करते. वृत्तपत्रस्वातंत्र्याचे पाईक व जगातील सर्वांत मोठ्या लोकशाही देशाचे नेते आपले स्वत्व, स्वाभिमान सर्व सर्व काही विसरून गुळाच्या ढेपेला चिकटणाऱ्या मुंगळ्यांप्रमाणे सत्ताधिशांच्या पायी लोळण घेत होते. आपल्या पुस्तकातील पत्रकारांविरुद्ध केलेल्या आरोपांचा अनेक नामवंत पत्रकारांनी इन्कार केला आहे. ('सन्डे' या साप्ताहिकातून) पण एकाही राजकीय नेत्याने मात्र असे काहीही केले नाही!

श्री. युनुस यांनी आपल्या पुस्तकात लिहिले आहे की, श्रीमती गांधींनी लेखी आज्ञा दिल्यानंतरही श्री. विद्याचरण शुक्ला यांनी संपूर्ण सेन्सॉरशिप उठवली नाही. उठवली ती फक्त परदेशी वृत्तपत्रांवरील! श्रीमती गांधींनी परत ताकीद देऊनही श्री. शुक्ल यांनी त्याबाबत काहीच केले नाही. देशाच्या पंतप्रधानांची अवज्ञा, त्यातूनही श्रीमती गांधींसारख्या पंतप्रधानांची, करण्याबाबतची ही गोष्ट विश्वासार्ह वाटत नाही.

असो. पुस्तकात एकंदरित वादग्रस्त मुद्दे भरपूर आहेत. त्यामुळे जेवढे सांगावे तेवढे थोडेच आहे.

या पुस्तकाचे एक वैशिष्ट्यच म्हणजे श्री. युनुस यांनी उद्‌धृत केलेले उर्दू शेर! नेहरूंच्या मृत्यूनंतरच्या आपल्या मनःस्थितीचे वर्णन करताना त्यांनी पुढील शेर दिला आहे. "हजारों साल नर्गीस अपने बेनुरीपे रोती है। बडे मुश्कीलसे होता है चमनमें दीदावर पैदा।"

असे हे वाचनीय, वादग्रस्त पुस्तक यातील किस्से, घटना व व्यक्तिचित्रे यांच्यासाठी तरी अवश्य वाचावे. दुसऱ्या आणीबाणीनंतर कदाचित त्यांचे दुसरे पुस्तक निघेल; पण तशी शक्यता फारशी वाटत नाही. कारण खुशवंत सिंग व नरगिस हे राज्यसभेत जाऊन बसलेत; पण युनुस मात्र सध्या कोठे आहेत त्याचा पत्ता लागत नाही.

–रवींद्र बिवलकर
–जे. एन्. पोंडा


आवृत्ती संपत आली....

जनांचा प्रवाह चालिला

लेखक :
विनय हर्डीकर

मूल्य :
वीस रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# संध्याकाळचे पुणे

पृष्ठ ३ वरून...

भगवान विष्णू बर्कले ओढीत पहुडला होता किंवा शंकराने गुडगुडी तोंडात धरली होती अशी वर्णने आली असती. मोगलकाळात धूम्रपानास प्रतिष्ठा आली. बाकी सगळे रोग पूर्वेकडून पश्चिमेकडे गेले.हा तंबाखूचा रोग तेवढा पश्चिमेकडून पूर्वेस आला. तंबाखू ओढण्याची युक्ती कशी निघाली ? सिगारेटला धूर नसता तर ती कुणी ओढली नसती. 'यत्र यत्र धूमः तत्र तत्र धुंदी–' लज्जाहोमाच्या धुराची धुंदी. रमीत सिगारेटच्या धुराची धुंदी. पूजेत उदबत्त्यांच्या धुराची धुंदी. सिगरेटच्या जाहिराती अशा असतात, 'आमची एक सिगारेट ओढताच थकवा जातो.' ठीक ! मग पुढची सिगारेट का ओढता ? दुःख झाले की सिगारेट. विमनस्क मन झाले,म्हणून सिगारेट. आनंद झाला म्हणूनही सिगारेट. आपण व्यसनाचं फाजील कौतुक करतो, हा गुन्हा आहे आणि आपल्या मनाचंही फाजील कौतुक करतो, तो त्याहून गुन्हा आहे.

¤

सिगारेट, विडी, तंबाखू यापायी होणारे शारीरिक नुकसान आज सिगारेटच्या जाहिरातींवर छापलेले असते. हे जे वाक्य 'सिगारेटपासून आरोग्याला धोका आहे' त्याच्या इतका विनोद कुठचा नसेल ! पान पान सप्तरंगी जाहिरातीत कुठे तरी कोपऱ्यातील अंधारात हे वाक्य असते. सिगारेटी बनवायला परवानगी द्यावयाची व धोका आहे म्हणून ओढू नका सांगावयाचे यात अर्थ काय ? माणसांचे हित व व्यवसायातला नफा यातली ही रस्सीखेच असावी. परवाच मी एक लेख वाचला. सिगारेटमुळे कॅन्सर होण्याचा संभव खूपच हे खरे (त्या लेखात होते); पण खूप सिगारेट ओढणाऱ्यांच्या तपासणीतून एक गोष्ट निघाली आहे की, या लोकांत हायब्लडप्रेशरचे प्रमाण फार कमी असते. तेव्हा आता तुम्ही कॅन्सरचा धोका पत्करावयाचा की हायब्लडप्रेशरचा एवढाच प्रश्न आहे. सिगारेट माणसास मारत किंवा मारीत नाही असे दोन्ही तऱ्हेचे लेख प्रत्येक मासिकात सारखे येत असतात. मला स्वतःला असे वाटते की, या चर्चा चुकीच्या तऱ्हेने होत आहेत. एका सिगारेटने किंवा एक चमचा दारूने प्रकृती बिघडत नाही; पण आज व्यसनांचा अतिरेक करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. ही प्रवृत्ती हा खरा रोग आहे. ही प्रवृत्ती कशामुळे निर्माण झाली त्याचा शोध घेणे आवश्यक आहे. हा शोध घेणे माझ्या आवाक्याबाहेरचे आहे.

¤

गोविंद खरे यांनी आजपर्यंत आरोग्यविषयक पंचवीस विषयांवर, इंग्रजी, मराठी, हिंदी भाषांतून दोनअडीच हजार कीर्तने दिली आहेत. तसेच मॉरिशसबेटावरही ते कीर्तने करून आले आहेत. त्यांच्या कीर्तनांना खरी चालना १९६४ पासून मिळाली. १९६५ सालापासून त्यांच्या कीर्तनांबद्दल जी. आर. निघाला. जी. आर. वर कीर्तन करणारे ते पहिले कीर्तनकार. बारा वर्षे सव्वीस जिल्ह्यांत कीर्तने केली. सर्व तऱ्हेच्या वस्तीत सर्व ठिकाणी ही कीर्तने झाली आणि विषय होते, ग्रंथमहिमा, सुखीसंसार, विमायोजना, सहकार, नदीमाहात्म्य, वृक्षमहिमा, आयुर्विमा. ते या कीर्तनासाठी खूप वाचन करतात व असंख्य म्हणी व सुभाषिते यांचा संग्रह त्यांनी केला आहे.

ते तंबाखू, विडी, सिगारेट यांच्या आकडेवारीत शिरले नाहीत याचे कारण कदाचित त्यामुळे कीर्तन नीरस होईल असे त्यांना वाटत असावे. मला वाटते ते आकडे जर त्यांनी त्यांच्या पद्धतीतून सांगितले तर कंटाळवाणे होणार नाहीत. अमेरिकेत एक माणूस वर्षास सरासरीने २७०० सिगारेटी ओढतो. त्याखालोखाल पश्चिम युरोपचा आकडा १ ते २ हजार आहे. बेल्जियममध्ये १५ वयापर्यंतची पन्नास टक्के मुले धूम्रपान करतात. बहुतेक सर्व प्रमुख देशांतून सार्वजनिक जागी धूम्रपानास बंदी आहे. भारतातले नक्की आकडे कळत नाहीत; पण माणशी दोन सिगारेटी रोज हे प्रमाण पडत असावं. तंबाखू-उत्पादनात भारताचा जगात तिसरा नंबर लागतो. ४५०,००० हेक्टर जमीन तंबाखूखाली आहे. यापैकी चारपंचमांश देशातच ती खपत. एकपंचमांश बाहेर जाते. एका आकडेवारीप्रमाणे दरडोई सिगारेटचे प्रमाण भारतात १९० यत. तच अमेरिकेत ४००० व युनायटेड किंगडममध्ये ३०५०. जपानमध्ये २८१० आहे. जगभरचे धूम्रपानक धूम्रपानावर निदान एक अब्ज डॉलर्स म्हणजे साधारण आठ अब्ज रुपये खर्च करतात. हा खर्च जागतिक लष्करी खर्चाच्या एकचतुर्थांश आहे.

विडी, तंबाखू वगैरेचा आणखी एक प्रश्न आपल्याकडे आहे तो म्हणजे तंबाखूच्या उद्योगात काम करणारांची भयाण परिस्थिती. निपाणीतील त्याबाबतची भयाण अवस्था कालच ऐकली; पण आम्ही माजगावकरांबरोबरच्या पदयात्रेत जे पाहिले तेही तसेच भयंकर होते. तंबाखू-कामगारास क्षय होतो. एका गावी आम्ही रात्री कंदील पुढे ठेवून शाळेच्या अंगणात वर्ग भरलेला पाहिला. रात्री–रात्रीपर्यंत मुले व त्यांच्याबरोबर शिक्षकही अभ्यासास बसतात. आता मुलांना तंबाखूच्या कामात घालावयाचे नाही. त्यांना काही करून शिकवावयाचे अशा निश्चयाने हा व भोवतालची गावे यत्न करीत होती.

¤

आरोग्याचा नाश, पैशाचा प्रचंड व्यय, कामगारांची भयानक अवस्था अशा सर्वच बाबी तंबाखूविरुद्ध उभ्या आहेत. डॉ. गोविंद खरे हे याच गोष्टी गमतीजमतीने आपल्या कीर्तनांतून सांगत असतात. ते म्हणतात की, या नव्या तऱ्हेच्या कीर्तनाचा जुने कीर्तनकार उपहास करतात; पण आज कीर्तनात बदल होणे ही सामाजिक गरज आहे. ते कीर्तनात जे गमतीने सांगतात त्याचे एक-दोन नमुने देऊन लेख संपवितो.

"दशरथ हा सेरिब्रल हेमरेजने गेला. कैकयीच्या मागणीने त्याचे ब्लडप्रेशर वाढले, तसेच गीतेतले छत्तीस श्लोक बाहेर काढले तर तो अर्जुनाच्या रोगाचा केसपेपरच होईल. 'क्षुद्रं हृदयदौर्बल्यं' अर्जुन हा मनोदौर्बल्याचा रुग्ण होता. भगवंतांनी त्याला सायकालॉजिकल ट्रीटमेंट देऊन युद्धावर धाडला."

अशा अनेक कल्पना त्यांच्या डोक्यांतून निघत असतात. कीर्तनात त्या रंग भरतात. ते शेवटी माझ्याजवळ म्हणाले, माझे आजोबा तात्यामहाराज केतकर गोंदवलेकर महाराजांची गादी चालवीत. लहानपणी आजोळी गेलो की कीर्तन ऐके. माझे वडील संस्कृत शास्त्री व शिक्षक होते. या दोघांचे संस्कार माझ्यावर झाले व त्यातून मी कीर्तनकार झालो. त्याशिवाय असेही म्हणता येईल की, लोकमान्यांची इच्छा त्यांनी कीर्तने करावीत अशी होती. ती इच्छा मी त्यांच्या नातजावयाने पुरी केली. □

हिंदी चित्रपट । सदानंद बोरसे

# कस्तुरी

एक जंगल ज्यात शिरायला सूर्यालाही कवडसा व्हावं लागतं, जिथं अक्राळ वृक्ष आणि विक्राळ वेलींची वेटोळी क्षणाक्षणाला अडवतात, अडकवतात, तडफडवतात, जिथं फुलांचा गंध, फळांचा स्वाद भुलवतो–कदाचित अलगद फशी पाडण्यासाठीच जिथं असंख्य हिंस्र, जहरी डोळे रोखलेले असतात, असंख्य लासट जिभा लवलवत असतात, जिथं एखादाच बोडका विरूप खडक भेडसावत असतो, जिथं शांतताच अनेक आर्त आक्रोशांपेक्षा जास्त भयानक असते असं एक जंगल· या जंगलची संस्कृती वेगळी, या जंगलचे कायदे वेगळे, नेहमीच्या तर्कशास्त्राच्या चौकटीत न बसणारे आणि म्हणूनच या जंगलाच्या कायम सहवासात असणारी माणसं वेगळी, त्यांची मनं वेगळी.

पण कधी कधी–

वर्तमानपत्री बातम्यांमधील जंगलतोड अन् जंगलवाढ एवढ्यापुरताच जंगलाशी संबंध येणारी माणसे वर्तमानपत्रांची रद्दी आणि रेडिओची खरखर मागे ठेवून या जंगलाच्या हृदयाच्या गाभ्यात प्रवेश करतात आणि मग त्यांचं वर्तमानात वावरणारं मन उत्क्रांतीच्या चालत्या–बोलत्या इतिहासाच्या जंजाळात धडपडतं, ज्ञान–विज्ञानाच्या अभ्यासानं एका तर्कनिष्ठ रस्त्यावरून चालणारी बुद्धी पुनःपुन्हा स्वतःलाच चाचपून तपासून पाहू लागते, कधी तोल गमावते, पुन्हा सावरते आणि या साऱ्यातून जाणीव होते अशाश्वत अस्तित्व टिकवण्याच्या धडपडीतून दिसणाऱ्या मानवी जीवन–मृत्यूइतक्याच निश्चित, आदिम आणि शाश्वत असणाऱ्या भावकोषांची, मनोव्यापारांची.

¤

रूढी, श्रद्धा, अंधश्रद्धा यांबद्दल इतक्या–इतक्यात बरेच चित्रपट येऊन गेले. अगदी अलीकडचे म्हणजे सर्वसाक्षी आणि गोधूलि. या दोन्ही चित्रपटांमध्ये श्रद्धा योग्य/अयोग्य, उपयुक्ततावादाची मर्यादा, अंधश्रद्धांमागील भूमिका इत्यादी अनेक गोष्टींबद्दल प्रसंग, व्यक्तिरेखा व विचार यांच्याद्वारे दोन्ही बाजू मांडल्या होत्या. एखादी रूढी ही दोन्ही चित्रपटांमध्ये केंद्रबिंदू होती आणि तिच्या भोवती थोडासा खंडन–मंडनाच्या स्वरूपात चित्रपट रचला होता. या पार्श्वभूमीवर 'कस्तुरी' हा नुकताच प्रदर्शित झालेला चित्रपट चांगलाच उठून दिसतो. चित्रपटाचे लेखक–दिग्दर्शक आहेत बिमल दत्त.

प्रमिला मुजुमदार (नूतन) नावाच्या तरुणीची, तिच्या मानसिक आंदोलनांची ही कथा. प्रा. प्रशांत मुजुमदार (डॉ. श्रीराम लागू) 'कस्तुरी' नावाच्या पक्ष्याच्या शोधात असताना त्याच्या मित्राचे–आतिशचे (परीक्षित सहानी) त्याला कस्तुरी सापडल्याचे पत्र येते. आतिश एक फॉरेस्ट–ऑफिसर आणि त्याच्याच जंगलात या कस्तुरीचे वास्तव्य असते. प्रशांत ताबडतोब कस्तुरी पहाण्यास येतो. निरीक्षण करताना प्रशांतच्या हातून कस्तुरीची दोन अंडी फुटतात. त्या जंगलातील आदिवासी मांत्रिक समरू प्रशांतवर जंगलच्या देवाचा–बासुकचा (वासुकी?) कोप होईल, असे सांगतो. तिकडे दुर्लक्ष करून परतणाऱ्या प्रशांतला अर्धांगवायूचा झटका येतो. यानंतर प्रशांतला बरे करण्यासाठी आतिशने समरूच्या मदतीने चालविलेल्या प्रयत्नांचा, जंगलात राहात असताना त्या वातावरणाचा, वेगवेगळ्या प्रसंगांचा प्रमिलाच्या मनावर होणारा परिणाम आणि त्याला होणाऱ्या तिच्या प्रतिक्रिया चित्रपटातून आपल्यापुढे मांडल्या जातात.

सर्वसाक्षी वा गोधूलीशी थोडी तुलना करून 'कस्तुरी'चे वेगळेपण सांगायचे; तर–

'गूढ शक्तींची भक्ती करणारा मार्ग श्रद्धांचा, त्यांचा शोध घेणारा मार्ग विज्ञानाचा' ही सर्वसाक्षीची दिशा होती; तर गाय–एक श्रद्धा आणि एक उपयुक्त प्राणी यांमधील झगडा हा गोधूलीचा विषय होता. दोन्ही ठिकाणी या श्रद्धा वा रूढीनामक प्रकाराला भावनांच्या, विचारांच्या दोन बाजू होत्या. 'कस्तुरी'मधील बासुकच्या अस्तित्वाला, रागाला अशा दोन बाजू नाहीत. केवळ योगायोगाने फुटलेली कस्तुरीची अंडी, त्या वेळीच प्रशांतला आलेला अर्धांगवायूचा झटका (प्रशांतला रक्तदाबाचा विकार असतो, हे या ठिकाणी उल्लेखनीय) वा नंतर प्रशांतवर केले जाणारे मंत्रतंत्राचे उपचार यात कुठेही बासुकला उपद्रवमूल्यसुद्धा नाही. ('सर्वसाक्षी'त कृतिशील मांत्रिकाच्या रूपाने या अंधश्रद्धांना असे उपद्रवमूल्य लाभले आहे.) म्हणूनच अंधश्रद्धेची वा श्रद्धेची बाजू मांडण्याचा प्रकारच नसल्यामुळे ती खोडून काढणे उरतच नाही. म्हणूनच कस्तुरीमध्ये मध्यवर्ती महत्त्व मिळते ते प्रशांत, आतिश आणि सर्वांत प्रामुख्याने प्रमिलाच्या मानसिक आंदोलनांना.

स्वतः प्रथम बासुक, त्याचा कोप इत्यादी प्रकारांची हेटाळणी करणारा प्रशांत अर्धांगवायूचा झटका आल्यानंतर मात्र (जीव जगवण्यासाठी?) समरूकडून उपचार करून घ्यायला मान्यता देतो. आयुष्याबद्दल आत्यंतिक अनासक्त बनल्यानंतर प्रमिला व आतिश यांना अधिक जवळ आणण्यासाठी प्रशांत जंगलातच राहण्यास तयार होतो.

प्रमिलाबरोबर स्वतः लग्न करण्यापूर्वी प्रशांतने खरं म्हणजे प्रमिला व आतिशच्या लग्नासाठीच प्रयत्न केलेला असतो. त्या वेळी न जाणवलेले व जाणवूनही अव्यक्त राहिलेले प्रेम प्रमिला व आतिश दोघांच्याही मनात प्रशांतच्या आजारपणात उफाळून येते. एकमेकांबद्दल वाटणारी ओढ, त्याबरोबरच 'आपण प्रशांतशी प्रतारणा करतो आहोत का?' या विचाराने दोघांमध्ये निर्माण झालेला ताण (तो ताण आतिश दारूच्या नशेत बुडविण्याचा प्रयत्न करतो; तर प्रमिला कधी त्या ताणाखाली गुदमरत, कधी त्याच्यावर मात करते, तर कधी माडून पडते–अगदी उन्मादाचे झटके येईपर्यंत), या सगळ्यामुळे कधी इतरांपासून–मुख्यत्वे प्रशांतपासून, कधी एक दुसऱ्यापासून तर कधी स्वतःपासूनच लपण्याची दोघांची धडपड, तडफड चित्रपटात जंगल, बासुक, आदिवासी, रूढी इत्यादींच्या पार्श्वभूमीवर चितारली आहे. या पार्श्वभूमीतून त्यापुढे घडणाऱ्या पात्रांच्या क्रिया–प्रतिक्रियांमधून कैक प्रश्नांची वेटोळी आपल्यापुढं उलगडत जातात. काही प्रश्नांची उत्तरं त्या प्रसंगांतच सामावलेली असतात.

१. जीवनात निर्माण केलेले शकुन, संकेत म्हणजे आपल्याच मनाचे खेळ नव्हेत का? आपल्याच अपेक्षेत परिणामाप्रमाणे वा कोंड-

लेल्या अवस्थेप्रमाणे प्रत्येक घटनेला शुभ वा अशुभाच्या चक्रावर गरगरायला लावून आपण आकार देतो आणि हे गरगरविणे वा आकारही आपलेच भरकटणे. प्रत्यक्षात त्या बिचाऱ्या घटनेचा त्याच्याशी काहीच संबंध नसतो.

२. प्रमिला बुढ्ढ्या बाबाला भेटायला जाते; तेव्हा 'तुझ्या मनात साप आहे. तो तुला दंश करू पाहतोय. त्याच्यापासून सावध राहा !' असा इशारा देणारा बुढ्ढा बाबा आणि त्याच वेळी आपल्या पतीशी प्रतारणा करण्याच्या पापाबद्दल प्रायश्चित्त भोगणारी आदिवासी स्त्री नीती, पति-पत्नींच्या शारीरिक संबंधांवरच त्यांची एकनिष्ठता आणि नीतिमत्ता आधारित आहे का, सामाजिक नीतिमूल्ये आणि प्रेमभावना यात कोण त्याज्य, प्रेमाशिवायची एकनिष्ठता योग्य आहे का, प्रेम म्हणजे काय ? प्रेम व शारीरिक आकर्षण यातील लक्ष्मणरेषा कोणती ? इत्यादी अनेक प्रश्नांचे काहूर डोक्यात उठवून देतात.

३. महादेव (साधू मेहेर) आपल्या पत्नीबरोबर झोपला असताना तिला साप चावतो. ती मेल्यानंतर महादेव फक्त एकाच गोष्टीने झपाटतो, तोच साप सर्पिणीबरोबर असताना त्याला मारायचे आणि साथीदार गमावल्याचे दुःख काय असते याची त्याला जाणीव करून द्यायची. तशा पद्धतीने आतिशने त्याला साप मारून आणून दिल्यावर महादेव आनंदाने बेहोष होतो आणि आयुष्याची इतिकर्तव्यता झाली, असे मानून आत्महत्या करतो. आयुष्यात प्रत्येकजण महादेवच नसतो का ? कोणत्या तरी महत्त्वाच्या वाटणाऱ्या फोल गोष्टीमागे धावण्यात आपण सार्थकता मानतो; पण ती वजा केल्यास आपण कशासाठी जगतो ? कशासाठी जगतो याचा शोध घेण्यासाठी जगण्यात तरी काही अर्थ आहे का ? की मरण टाळण्यासाठी आणि जगत राहण्यासाठी काढलेली ती पळवाट आहे ? आणि जर मरणार असू तर ते तरी कशासाठी ? त्यात तरी काही अर्थ आहे का ? महादेवचे हे मूढ, मूक अस्तित्व संपूर्ण चित्रपट भारून टाकते.

४. पृथ्वीवरील जीवनाच्या उदयापासून आजपर्यंतच्या-वर्तमानापर्यंतच्या उत्क्रांतीवर एक सुरेख निवेदन आहे. जिवंत प्राणी आणि मृत प्राणी वा निर्जीव वस्तू यात फरक काय? तर जिवंत प्राणी external stimulus ला प्रतिसाद देतो, निर्जीव तसा देत नाही. जीवाश्म हे मृत झालेल्या जीवांचे अवशेष. शेवटी वर्तमानात जगणारे आपणही केव्हा तरी असा प्रतिसाद देणे बंद करून जीवाश्म बनायला लागणार.

अशा एक ना दोन अनेक विचारांची वलये चित्रपट पाहताना उठतात.

आणि या विचारांच्या वावटळीत सतत जाणवत राहते ते प्रमिलाचे ओढाळ मन. कधी रात्री फिरताना आपल्याच पावलांचा प्रतिध्वनी ऐकून दचकण्याचा, मागे वळून पाहण्याचा, क्वचित चालण्याचा वेग वाढवण्याचा आणि लक्षात आल्यानंतर स्वतःच ओशाळे हसण्याचा अनुभव आपण घेतलेला असतो. कदाचित शब्दशः हा नसेल; पण असाच एखादा अनुभव. 'कस्तुरी'मधील प्रमिला म्हणजे अशाच अनुभवाचा ब्लो अप आहे. कदाचित त्यामुळेच काही वेळा तिच्यात अवास्तव वाटण्याइतका भडकपणाही आढळतो; पण ही प्रमिला अस्वस्थ करते नक्की.

चांगला चित्रपट शेवटी बिघडविण्याचे दिग्दर्शक विमल दत्त यांचे कसब मात्र चांगलेच खटकले. इसापनीतीत वा पंचतंत्रात जसे सांगितलेल्या गोष्टीचे तात्पर्य दोन ओळीत दिलेले असते, त्याप्रमाणे 'कस्तुरी'-तही चित्रपटाचे तात्पर्य शेवटच्या दोन मिनिटांत आपल्याला कळते की, 'बुवा मन ओढाळ ओढाळ, सारे त्याचेच हे खेळ.' चित्रपटाचे संपूर्ण गूढ घालवण्याचे सामर्थ्य या शेवटात आहे.

कलाकारांचा विचार करता सर्वांत मनात घुसतो तो महादेव झालेला साधू मेहेर. शहरात जाण्याच्या कल्पनेनेच आनंदणारा, बायकोवर निरतिशय प्रेम असणारा भाबडा महादेव, बायको मेल्यानंतर उदास, अबोल, वेडात बुडालेला महादेव सतत तुमचा पाठलाग करीत राहतो. त्यानंतरचा क्रमांक प्रमिला साकारणाऱ्या नूतनाचा. अर्धांगवायूच्या झटक्याने मलूल पडून राहाणे यासाठी डॉ. लागूंना काही फार कष्ट करावे लागले असतील असे वाटत नाही. बाकी सुलभा देशपांडे आणि समरू झालेला अभिनेता यांची कामे उल्लेखनीय.

चित्रपटाच्या पार्श्वसंगीतामध्ये आदिवासींचे संगीत आणि कस्तुरीचे अतिशय मंजुळ ओरडणे या गोष्टी चांगल्याच लक्षात राहिल्या.

आत्यंतिक सुंदर आणि मुख्य म्हणजे विषयानुरूप छायाचित्रण हे चित्रपटाचे आणखी एक वैशिष्टय. छायाचित्रकार के. के. महाजन.

□


## नवीन दाखल झालेली पुस्तके

| | रुपये |
|---|---|
| १. प्रथम पुरुषी, एक वचनी (आत्मचरित्र) : पु. भा. भावे | ४०–०० |
| २. इण्टिमेट (कथासंग्रह) : व. पु. काळे | १६–०० |

**ENGLISH**

1. **I Married A Bestseller** : (Autobiography by the wife of Arthur Hailey discribing the letters' literary life)– Sheila Hailey — $ 2·50
2. **Boarding Party** : (Filmed as 'The Sea Wolves') James Leasor — Rs. 30/–
3. **The Sea Hawk** (Life and Battles of Kanhoji Angrey) Manohar Malgaonkar — Rs. 12/–

o "I find that the only thing that really stands up, better than gambling, better than booze, better than women, is reading."– Mario Puzo.

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव, पुणे ३०**

चाळा । भाऊ पाध्ये

# जबरदस्त

## पुरणपोळीची शोकांतिका



नाटकाचे नाव ' जबरदस्त. ' जाहिरातीत 'ओमेन–२ ' या चित्रपटाच्या डिझाइनची उचलेगिरी केलेली. जाहिरातीमधील Catch lines दाजीशास्त्री, त्यांच्या वृद्ध पत्नी, तरुण नात वगैरे वगैरे पुण्याच्या खून झालेल्या अभ्यंकर कुटुंबाची याद देणाऱ्या. लेखक–प्रदीप दळवी–धड नवोदित नव्हे; पण तरुण. यापूर्वीची काही नाटके अशी– (१) कार्तिकेय (विषय–रामन राघवन) (२) माताजी (विषय–सांगायला नकोच) आणखी एक फार्स वगैरे. नाटकाची काही नामांकित पात्रे–रवि पटवर्धन, माधव आचवल. सौ. नीलम बबन प्रभू, लता थत्ते, पद्माकर आठवले वगैरे.

एकूण प्रदीप दळवी या तरुण नाटककाराचा सेन्सेशनल घटना उचलून रंगभूमीकर पेश करण्याकडे उघडच कल दिसतो. त्याला जामानिमा चांगला जमवता येतो. एक समर्थ निर्माता, थोडेफार मान्यवर कलाकार, डेकोरेटिव्ह सेटस्‌चा थाट, पब्लिसिटीची झोड. अशा तरुण लेखकाने आपल्या या चौथ्या नाटकाचा पहिला प्रयोग हाउसफुल्ल घेऊन आपली व्यावसायिक चलाखी सिद्ध केली आहे असे म्हणण्यास काहीच हरकत नाही. अर्थात एखादा कादंबरीकार तिसऱ्या किंवा चौथ्या कादंबरीपर्यंत नवोदित कादंबरीकार राहत नाही व त्याप्रमाणे नाटककारही राहात नाही व त्याला त्याचे स्थान दाखवणे, ही समीक्षकावर जबाबदारी येऊन पडतेच.

अभ्यंकर खूनप्रकरणासारख्या घडलेल्या घटनेवर नाटक कसे उभे राहू शकेल ?

एक तर आपण कुठल्याही वाचनालयामध्ये जाऊन वर्तमानपत्राच्या जुन्या फायली पाहाव्यात आणि त्या प्रकरणाचे वृत्त लिहून काढावे– तर तेही नाटक होईल.

किंवा या प्रकरणाचा सद्यःस्थितीशी संबंध जोडून, त्यावर आपले भाष्य सांगण्याचाही प्रयत्न करता येईल. जक्कल, चांडक वगैरे सुशिक्षित मंडळींनी खुनाचे सत्र आरंभण्यामागे त्यांच्या मनोवृत्तीवर ज्या ज्या गोष्टींचा संभाव्य परिणाम झाला असेल, असे नाटककाराला वाटेल त्या त्या गोष्टी उलगडून प्रेक्षकांसमोर दाखवता येतील. उदा. ' शोले ' या चित्रपटाच्या खलपुरुषाचे ऑबसेशन या खुनाच्या मागे आहे, असे नाटककाराला वाटले तर तो आपल्या नाटकातून ते सिद्ध करू शकेल ! काहीही असो प्रदीप दळवी यांचे ' जबरदस्त ' पाहताना त्यांना प्रस्तुत प्रकरणाबद्दल वाटेल ते सांगण्याचा अधिकार मंजूर केल्यावर, ते काय सांगतात ते समजून घेण्याच्या हेतूनेच आपण नाटक पाहिले.

नाटकाचे कथानक आता सर्वपरिचित होते. तीन प्रश्न उपस्थित झाले ते असे– १. नाटकाचे ' जबरदस्त ' हे नाव, २. नाटक पेश करण्यातील नाटककाराचा उद्देश व ३. नाटकाचे तंत्र.

नाटकाचे ' जबरदस्त ' नाव हे catchy आहे; पण ते कुणाला लागू पडते ? नाटककाराला खून करणारे जबरदस्त वाटतात की या खुनामुळे जबरदस्त समस्या उभी राहयली आहे असे वाटते ? खुनी व्यक्ती ह्या जबरदस्त असल्या, तर त्याचे एखादे पाश्चात्य धर्तीचे यशस्वी chiller उ झाल्याचा अनुभव आपण घेतला असता; कदाचित पुण्याच्या परिसरात निर्माण झालेल घबराट किंवा खुन्यांनी खुनाच्या वेळ दाखविलेली निर्घृणता ही प्रेक्षकांसमोर पेश करण्याचा खटाटोप केला गेला असता; परं या नाटकातील खुनी असामी आपला गुन्ह केवळ लाइटली घेत नाहीत तर बाष्कळपणे वागतात. पोलिसांच्या पहाऱ्यात त्यांचे पत्ते खेळणे, दाजीशास्त्रींचा खून करताच त्यांच्या घरातील शिऱ्यावर उडचा मारणं, यामुळे हे खुनी आपण जाणूनबुजून हास्यास्पद होण्याचा प्रयत्न करताहेत असं वाटतं. एखादा खुनी बेरड असून तो लाइटली वागेल म्हणजे कसा वागेल, हे आकलन होण्याची कुवत तरी नाटककाराजवळ नसावी किंवा त्याने त्याचा प्रस्तुत विषय Exploit करण्याच्या नादात फारसा विचार केला नसावा. त्यामुळे–म्हणजे हे खुनी जबरदस्त आहेत, हे न पटल्यामुळे–खून करण्यापेक्षा हॉटेलातले बिल चुकवण्याची आयडिया कामयाब करणाऱ्या भुरट्या पोरांच्या योग्यतेचेच नाटक पेश झाल्यामुळे ते जबरदस्त वाटले नाही. दुसरा जबरदस्तपणा समस्येचा. या देशाचा वारसा सुभाष बोस, साने गुरुजी, भगतसिंग यांचा, असे असताना अशी मुले का जन्माला यावीत ही नाटककाराच्या लेखी प्रेक्षकांसमोर ठेवण्याची जबरदस्त समस्या आहे. खरं तर या समस्येचे उत्तर नाटककारानेच द्यायचे आहे. जी घटना घडली आहे, ज्याचे निकालपत्रही प्रसिद्ध झाले, त्यावर वृत्तपत्राच्या संपादकाने अग्रलेख लिहिल्याप्रमाणे, नाटककाराने एका पात्राच्या तोंडून ही समस्या गंभीर आहे असे वदवून घेण्यात, नवे काय सांगितले ? गोविंद तळवळकर किंवा माधव गडकरी जे आपल्या दैनिकात लिहितात तेच नाटकातले पात्र बोलू लागले तर ते नाटक होत नाही; डॉक्युमेंटरी होते.

नाटककाराने अर्थातच उपरोक्त समस्या

आपण मांडणार आहोत याचा नाटकभर थांगपत्ता लागू दिला नाही आणि शेवटच्या क्षणाला या नाटकाचे नायक अॅसि. पोलिस-कमिशनरसाहेब यांच्या तोंडून वदवून प्रेक्षकांना धक्का दिला आहे. दाजीशास्त्र्यांच्या खुनाच्या निमित्ताने पुण्याला आलेला हा कमिशनर खुनाच्या उद्दिष्टाविषयी अधूनमधून बोलतो, त्या वेळी माझ्यासारखे कायद्याच्या संदर्भात अज्ञानी प्रेक्षक कायद्यातील काही त्रुटी असतील तर त्या पुऱ्या करण्याचा त्याचा प्रयत्न असावा असेच समजतो. गुन्हेगारांनी आपला गुन्ह्याचा जबाब दिलेलाच असतो. एवढ्याने समाधान होत नसावे म्हणूनच की काय, तो या गुन्ह्याच्या संबंधित असलेल्या प्रत्येक व्यक्तीने बोललेच पाहिजे, असे म्हणत असतो.

यासाठी तो सदर खूनप्रकरणाची पुनर्रचनाच (Re–enactment) करतो.

या नाटकात एक एक गोष्टी अशा येतात ज्या दुसऱ्याशी सुसंगतपणे जोडता येणार नाहीत. उदा. प्रथमच अॅसि. कमिशनर गुन्ह्याच्या ठिकाणी मोजमाप घेणे वगैरे काही तरी (खुणा) करत असतो. तर मग असे समजावे की, गुन्हेगारांनी गुन्ह्याचा कबुलीजबाब दिलाच आहे......पुन्हा गुन्हेगारांची जबानी आणि पोलिसअधिकाऱ्यांची Findings यातील फारकत प्रस्थापित करण्यासाठी 'राशोमॉन' शैलीत गुन्ह्याचे re-enactment दर्शवण्यात आले आहे. परंतु या फारकतीच्या मुद्द्याचे पुढे काहीच होत नाही. तसेच, re-enactment-मधून एक फिल्मी डिव्हाइन वापरून हा कमिशनर गुन्हेगारांना 'No crime is perfect' असे सुनावतो; परंतु क्राइमच्या पर्फेक्शनसाठी गुन्हा केला असल्याचे मात्र म्हटले जात नाही...एकूण हे जबरदस्त जसजसे पुढे सरकत जाते तसतशी मती गुंग होत जाते. आपण काय पहात आहोत हेच समजेनासे होते. गुन्हेगारीची समस्या म्हणजे एखादी गुजराथी थापी आहे असे समजून भाजी, आमटी, 'उध्यु, पापड, चटणी, अथेणु-प्रमाणे नाटककाराने गुन्ह्याच्या फेररचनेबरोबर तुरुंगातील मयताच्या कपड्यांची ओळख, गुन्हेगारांच्या आईच्या मुलाखती वगैरे वगैरे पेश करत अखेरच्या अंकामध्ये कोर्टसीनचं मुख्य पक्वान्न पेश केले आहे. वकील साक्षीदाराची जबानी घेताहेत, 'ऑब्जेक्शन माय लॉर्ड' 'ऑब्जेक्शन सस्टेन्ड' वगैरे कोर्टाच्या पोटभाषा जरी नाटककाराला माहीत आहे एवढे प्रेक्षकांना समजले तरी नाटक काय चालले आहे याबद्दल प्रेक्षक अज्ञानीच रहातो. सर्वांत म्हणजे सरकारी वकिलाचे भाषण तो काय बडबडतो ते समजतच नाही. त्याची एकदम धाडधाड डेक्कनक्वीन सुटलेली असते. अखेर कोर्टाचा निवाडा ऐकून ह्या कोर्टयीनची गाडी थांबते.

एवढे निरूपण केल्यावर मला वाटतं जबरदस्तविषयी जास्त काही सांगायला पाहिजे असे नाही. कुणाच्या अभिनयासंबंधी लिहिणेही बरे होणार नाही. कारण एरव्ही या नाटकातील कलावंत नाणावलेले आहेत व त्यांच्या कामगिरीची छाया त्यांच्या इतर भूमिकांवर पडू नये.

या नाटकात मधूनमधून पुरणपोळीचे प्रकरण येते. या गुन्हेगारांचा म्होरक्या पुरणपोळीचा मोठा भक्त आहे. आईच्या हातून तो तुरुंगात लडिवाळ बाळाप्रमाणे पुरणपोळी खातो, तर आईला त्याने खून केल्याची खात्री पटताच ती त्याला पुरणपोळी भरवत नाही आणि शाप देते. एव्हढ्यानेच भागत नाही. कोर्टातही पुरणपोळी येतेच. मुलाला फाशी दिली जात आहे, आईला रडं कोसळत आहे आणि ती त्याला पुरणपोळी भरवते आहे असं टॉवेल भिजवणारं दृश्य पहावं लागतं. पुरणपोळीच्या भक्तांनी खून पाडून हजारो रुपये पळवावेत; पण अखेर चतकोर पुरणपोळीला मोताद व्हावं ही केव्हढी बरे शोकांतिका ! मॉसीएर व्हर्दु हे चार्ली चॅप्लिनने उभे केलेले कॅरेक्टर फाशीच्या तख्तावर चढताना 'रम'ची मागणी करते. अरे, त्या चार्ली-चॅप्लिनला पुरणपोळचांची लज्जत काय असते ते ठाऊक नव्हते का ?


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना
हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. –डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये. राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

# दुर्बळांचें रक्षण करा...
# त्यांना मदत करा

हरिजनांवरील, तसेंच, इतर दुर्बल घटकांवरील हल्ले, आपल्या समाजास कमीपणा आणतात. त्याचप्रमाणे, ते आपली प्रगतीकडे होणारी वाटचालहि रोखून धरतात.



या ! भारतीय परंपरेची काळजीपूर्वक जपणूक करू या !

**आपण सारे एक**

DAVP 79/536